दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१४ | रविवार, दि.४ मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

### संपादकीय

## ईव्ही धोरण; प्रगत महाराष्ट्राला शोभणारा निर्णय...!

पर्यावरणपूरक विद्युत वाहनांना प्रोत्साहन देण्याचे धोरण महाराष्ट्र सरकारने स्वीकारले असून राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या दिशेने अनेक निर्णय घेण्यात आले हे निश्चित स्वागतार्ह आहे. राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयाप्रमाणे राज्यातील तीन मोठ्या महामार्गांवर विद्युत वाहनांना टोलमाफी देण्यात येणार आहे, त्याशिवाय राष्ट्रीय महामार्गावर विविध ठिकाणी चार्जिंग स्टेशन्स उभारली जाणार आहेत आणि राज्य व राष्ट्रीय महामार्गावर काही ठिकाणी पथकरामध्ये सवलतही दिली.

## इंजिनिअरिंग, फार्मसीच्या प्रवेश परीक्षेचा पेपर उद्या होणार

मुंबई–इंजिनिअरिंग, फार्मसीच्या प्रवेश परीक्षेचा पेपर सोमवारी होणार आहे. अभ्यासक्रमात चूक असल्याने २७ तारखेला होणारी परीक्षा रद्द झाली होती. विद्यार्थी आणि पालकांनी सीईटी सेलकडे तक्रार केली होती. यादीमध्ये नाव असलेल्या विद्यार्थ्यांना हा पेपर देणे बंधनकारक आहे. राज्य सामाईक सेलच्या वेबसाईटवर यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

# संपूर्ण महाराष्ट्राला अवकाळी पुन्हा झोडपणार

**मुंबई । प्रतिनिधी**

**सध्या पश्चिमी चक्रावताच्या प्रभावामुळे हिमाचल प्रदेश उत्तराखंड, दिल्ली अशा उत्तरेकडील राज्यांमध्ये तुफान पाऊस सुरू आहे. तर दक्षिणेकडील राज्यांमध्येही वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. महाराष्ट्रात तापमानाचा पारा प्रचंड वाढला असून आता येत्या चार दिवसात कोकणपट्ट्यासह मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात अवकाळी पावसाचे अलर्ट देण्यात आले आहेत.**

## येत्या ५ दिवसात कुठे पाऊस? तापमान कसे राहील?

हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार सध्या चक्राकार वाऱ्यांची स्थिती राजस्थान सह मध्य प्रदेश व खालपर्यंत सक्रिय असल्याने महाराष्ट्रात पुढील पाच दिवस अवकाळी पाऊस हजेरी लावणार आहे. ३–४ व ५ मे रोजी विदर्भासह मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना पावसाचे इशारे आहेत. त्यानंतर उत्तर महाराष्ट्र मध्य महाराष्ट्र तसेच मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस येणार आहे. पान २ वर



### पावसाचे इशारा कुठे व कधी?

४ एप्रिल: नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, धुळे, नंदुरबार, अमरावती, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली –अवकाळी पावसाचा येलो अलर्ट. मुंबई, ठाणे, रायगड, पुणे, सातारा, बीड, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड जिल्हांमध्ये पावसाची शक्यता आहे. ५ एप्रिल : संपूर्ण राज्यात पावसाची शक्यता. मध्य महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा विदर्भ सर्व विभागांमध्ये बहुतांश ठिकाणी अलर्ट. ६ एप्रिल : सातारा, पुणे, ठाणे, पालघर, नाशिक, अहिल्यानगर, बीड, जालना, छत्रपती संभाजी नगर, जळगाव, धुळे, नंदुरबार, यवतमाळ, चंद्रपूर या जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट. कोकण मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात उर्वरित ठिकाणी हलक्या सरींचा अंदाज. ७ एप्रिल : संपूर्ण कोकणपट्टा, मध्य महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र व बहुतांश मराठवाड्यात अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. यात विदर्भाचा समावेश नाही.

# पुढचे मुख्यमंत्री अजितदादाच!

## सुनिल तटकरेंचे मोठे विधान; राजकीय गोटात खळबळ





**मुंबई । प्रतिनिधी**

**अजित पवार यांनी आपल्याला सुध्दा मुख्यमंत्री व्हावं वाटत आहे, पण कुठे जमतंय, असे वक्तव्य केले होते. त्यावर बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी मात्र राजकीय खळबळ माजवून दिली आहे. पुढची शपथ आणि मुख्यमंत्री हे अजित पवार हेच होणार असल्याचे भाकित केले आहे.**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी २ मे रोजीच्या मुंबईतील एका कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्रिपदावर केलेल्या विधानाची सगळीकडे चर्चा होत आहे. या विधानाचे वेगवेगळे अर्थ काढले जात आहेत. मला गेल्या अनेक वर्षांपासून मुख्यमंत्री व्हावं वाटतंय पण कुठे जमतंय, असे अजित पवार म्हणाले होते. असे असताना याच मुख्यमंत्रिपदावर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचे नेते सुनिल तटकरे यांनी मोठं विधान केले आहे. सुनिल तटकरे मुंबईत पक्षाच्या कार्यक्रमात बोलत होते. यावेळी त्यांनी आगामी निवडणुका तसेच मुख्यमंत्रिपद यावर थेट भाष्य केले. अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री म्हणून सर्वाधिक वेळा शपथ घेतलेली आहे. मात्र अजित पवार यांनी पुढची शपथ ही मुख्यमंत्री म्हणून घ्यावी हे स्वप्न आहे, असे सुनिल तटकरे यांनी बोलून दाखवले. तसेच हे स्वप्न प्रत्यक्षात उतरवायचे असेल तर असे पक्षप्रवेश मोठ्या पान २ वर

### अजितदादांना पाच वर्ष मुख्यमंत्री होण अशक्य–जयंत पाटील

ज्यांना मुख्यमंत्री व्हायची इच्छा आहे, त्यांना माझ्या शुभेच्छा आहेत. पण मुख्यमंत्री होणं पाच वर्षे शक्य नाही. पण तरीही ते मुख्यमंत्री झालेच तर आम्हाला आनंद आहे, असे भाष्य जयंत पाटील यांनी केले आहे.

## आगे कुटूंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी सुप्रीम कोर्टापर्यंत लढू

### पंकजा मुंडे यांनी घेतली स्व.बाबासाहेब आगेंच्या कुटुंबियांची भेट




**माजलगांव । प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज किट्टी आडगाव येथे जाऊन स्व. बाबासाहेब आगे यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांना धीर दिला. आगे परिवाराचे दुःख हे माझे दुःख आहे, एक चांगला कार्यकर्ता आपण गमावला आहे. आगे परिवाराला न्याय मिळवून देण्यासाठी गरज पडली तर सुप्रीम कोर्टापर्यंत लढा देऊ अशा शब्दांत धीर देत ना. पंकजाताईंनी आगे यांच्या पान २ वर

## शिर्डीच्या साईबाबा मंदिराला बॉम्बने उडवण्याची धमकी

**शिर्डी । प्रतिनिधी**

**जगभरात प्रसिद्ध आणि कोट्यवधी लोकांचे श्रद्धास्थान असलेल्या शिर्डी साईबाबा मंदिराला बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. मंदीर उडवून देण्याची धमकी देणारा मेल साईबाबा संस्थानला प्राप्त झाला आहे. त्यामुळे सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली आहे.**




धमकीचा हा मेल संस्थानच्या अधिकृत मेल अकाउंट आला आहे. हा मेल मिळताच साईबाबा संस्थानची सुरक्षा यंत्रणा तसेच पोलिस यंत्रणा अलर्ट झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार काल (२ मे) सकाळी धमकीचा मेल प्राप्त पान २ वर

## लाडक्या बहिणींना एप्रिलचा हफ्ता जमा

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांसाठी एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे. लाडक्या बहिणींच्या खात्यात एप्रिल महिन्याचा हफ्ता येण्यास शनिवारी सकाळपासून सुरूवात झाली आहे.**



एप्रिल महिन्याचा दहावा हफ्ता शनिवारपासून खात्यात पान २ वर

### महाराष्ट्रदिनाच्या ध्वजारोहनाला २२ अधिकाऱ्याची अनुपस्थिती

## जिल्हाधिकाऱ्यांची कारणे दाखवा नोटीस

बीड । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी शिस्त आणि कर्तव्यकठोरपना आपल्या कार्यातून दाखवून दिला आहे. भर उन्हात विविध विकास कामाची पाहणी, अधिकाऱ्यांना कर्तव्य बजावण्याची सूचना, जनता दरबार आदी कामामुळे जिल्हाधिकारी ॲक्शन मोडवर असल्याचे दिसून आले आहे. दि. १ मे २०२५ रोजी महाराष्ट्र दिन ध्वजवंदन कार्यक्रमास अनुपस्थित राहिल्याबाबत सुमारे २२ अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावल्यामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्याचे धाबे दणाणले आहे. पान २ वर

# सोनं १९ हजारांनी होणार स्वस्त?

## दिलासा: 'या' एका कारणामुळे भाव गडगडणार?



### सोन्याचा भाव कमी होण्याची कारणं काय?

तज्ज्ञांच्या मते सोन्याच्या किमतीत सातत्याने चढ–उतार पाहायला मिळाले आहेत. जानेवारी महिन्यात सोन्यात गुंतवणूक करणाऱ्यांना साधारण २१ टक्क्यांनी रिटर्न्स मिळाले आहेत. एका वर्षात सोन्याने साधारण ३२ टक्के रिटर्न्स दिले आहेत. या मागे अनेक कारण आहे. जागतिक पातळीवरील तणाव, भूराजकीय परिस्थिती यामुळे सोन्याच्या भावात वाढ झाली आहे. सध्या मात्र जागतिक पातळीवरील तणाव निवळला आहे. अमेरिका, रशिया आणि युक्रेन यांच्यात कायमस्वरुपी शस्त्रसंधी करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे सोन्याच्या भाववाढीसाठी जी अनुकूल स्थिती झाली होती, ती सध्या राहिली नाही. त्यामुळेच सोन्याच्या दरात घट होताना दिसत आहे.

**मुंबई । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांत सोन्याच्या दरात सातत्याने वाढ पाहायला मिळाली. सोन्याने एक लाखाचा टप्पाही पार केल्याचे आपण पाहिले. आता मात्र सोन्याच्या दरात घसरण होत असलेली पाहायला मिळत आहे. असे असतानाच आता सोने भविष्यात पान २ वर

## थोडक्यात...

### जम्मू –कश्मिरमध्ये व्हीपीएन सेवांवर बंदी

जम्मू–काश्मीरमधील दोडा जिल्ह्यात प्रशासनाने व्हीपीएन सेवांवर बंदी घातली. जम्मू आणि काश्मीरमधील दोडा जिल्ह्यात प्रशासनाने व्हीपीएन सेवांवर बंदी घातली आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

### पाकिस्तानवर लवकरच मोठी कारवाई

नवी दिल्ली–विक्रांत अरबी समुद्रात तैनात करण्यात आला आहे. विक्रांतवरून क्षेपणास्त्राची चाचणी करण्यात आली आहे. राफेल मरीन फायटर जेट विक्रांतवर तैनात करण्यात आलं आहे. ६४ बराक आणि १६ ब्रह्मोस क्षेपणास्त्रांचा यात समावेश करण्यात आला आहे.भारत पाकिस्तानवर लवकरच मोठी कारवाई करण्याच्या तयारीत आहेत.

### हाफिजला पाकिस्तानकडून सुरक्षा

इस्लामाबाद–भारताच्या ॲक्शन मोडनंतर हाफिजच्या हालचालींवर पूर्णपणे बंदी. बिथरलेल्या हाफिजसाठी ३ बुलेटप्रूफ वाहनांचा लवाजमा करण्यात आला आहे. हाफिजसाठी पाकिस्तानकडून खास सुरक्षा देण्यात आली आहे. तसेच सध्या हाफिज हा दाट लोकवस्तीत लपून बसल्याची माहिती समोर आली आहे. पाकचा आर्मी कॅन्ट परिसर हा हाफिजचा नवा अड्डा असल्याचही म्हटलं जात आहे.

### सुषमा अंधारे राष्ट्रवादीमध्ये जाणार –अंजली दमानिया

मुंबई–एका मोठ्या माणसाने मला सांगितलं होतं की सुषमा अंधारे या शिवसेना ठाकरे पक्ष सोडून राष्ट्रवादीमध्ये जाणार आहेत आणि एका बंगल्यावर त्यांची भेट सुद्धा झालेली आहे. माझं केव्हा एवढेच सांगणं आहे की केवळ माहितीच्या आधारावर मी बोललेले आहे. त्यामुळे त्यांनी जरा संयमान घ्यावे, असे अंजली दमानिया म्हणाल्या.

### छगन भुजबळांनी सरकारला दिला घरचा आहेर

नाशिक–कुंभमेळ्याच्या कामांवरून भुजबळांनी व्यक्त केली नाराजी कुंभमेळा निधी, रिंगरोड आणि ईतर कामांवरून भुजबळ झाले संतप्त फक्त टेंडरवर लक्ष आहे असे म्हणत छगन भुजबळांचा रोख कुंभमेळा मंत्री गिरीश महाजनांकडे आहे का?, गोदावरी नदी स्वच्छ करा बाकी काही गरज नाही असा भुजबळ यांनी सल्ला दिला.

### पाकमधून भारतात येणाऱ्या सर्व वस्तूंवर बंदी

नवी दिल्ली–पाकिस्तानमध्ये उत्पत्ती झालेल्या किंवा पाकिस्तानशी संबंधित कोणतीही वस्तू भारतात आयात करण्यास बंदी पुढील आदेश येईपर्यंत कोणतेही साहित्य भारतात येणार नाही केंद्र सरकारचा मोठा निर्णय पाकिस्तान मधील कोणतीही वस्तू, धान्य भारतात आयात होऊ शकणार नाही.

### उन्हामुळे कांद्याचे नुकसान

नांदेड–नांदेडचे तापमान ४४ अंश सेल्सिअसवर गेले आहे. त्याचा फटका कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बसला आहे. काढणीनंतर साठवलेला कांदा उष्णतेने नासून शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. तसेच दुसरीकडे बाजारात कांद्यास पाचशे ते सातशे रुपये क्विंटल इतकाच बाजार भाव मिळत असल्याने शेतकरी अडचणीत आला आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३ मे २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ४९.०० क्विंटल | २,५१० | ३,००१ | २,७३७ |
| ज्वारी/हायब्रिड: १७६.०० क्विंटल | १,७५१ | २,७४० | २,२५७ |
| मका/लोकल:३.५० क्विंटल | २,०७५ | २,०७५ | २,०७५ |
| तूर : १.०० क्विंटल | ६,४०१ | ६,६०० | ६,५०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ६८.५० क्विंटल | २,००१ | २,८०१ | २,४५४ |
| मुग :४.५० क्विंटल | ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: १०२.५० क्विंटल | ४,४०१ | ४,४४१ | ४,४२२ |
| हरभरा: १४.०० क्विंटल | ५,४०१ | ५,४२० | ५,४१० |

## अग्रलेख

# ईव्ही धोरण; प्रगत महाराष्ट्राला शोभणारा निर्णय...!

पर्यावरणपूरक विद्युत वाहनांना प्रोत्साहन देण्याचे धोरण महाराष्ट्र सरकारने स्वीकारले असून राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या दिशेने अनेक निर्णय घेण्यात आले हे निश्चित स्वागतार्ह आहे. राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयाप्रमाणे राज्यातील तीन मोठ्या महामार्गांवर विद्युत वाहनांना टोलमाफी देण्यात येणार आहे, त्याशिवाय राष्ट्रीय महामार्गावर विविध ठिकाणी चार्जिंग स्टेशन्स उभारली जाणार आहेत आणि राज्य व राष्ट्रीय महामार्गावर काही ठिकाणी पथकरामध्ये सवलतही दिली जाणार आहे. एवढेच नव्हे तर मोटर वाहन करातून तसे नोंदणी प्रमाणपत्राच्या नूतनीकरण शुल्कातूनसुद्धा विद्युत वाहनांना सवलत दिली जाणार आहे. २०३० पर्यंत विद्युत वाहने खरेदी करणार्यांनासुद्धा काही प्रोत्साहनपर सवलत देण्यात येणार आहे. हे सर्वच निर्णय महत्त्वाचे आहेत.

गेल्या काही वर्षांच्या कालावधीपासून जगात, देशात आणि महाराष्ट्रातसुद्धा इलेक्ट्रिक वाहनांची लोकप्रियता वाढत चालली असली, तरी ज्या प्रमाणात या वाहनांना प्रतिसाद मिळणे गरजेचे होते तेवढा प्रतिसाद अद्याप मिळालेला नाही हेसुद्धा खरे आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने घेतलेल्या या विविध निर्णयांचा विचार करावा लागणार आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे केंद्र सरकार किंवा राज्य सरकार जेव्हा एखादे धोरण जाहीर करते तेव्हा त्या धोरणाची अंमलबजावणी करताना इतर सहाय्यक अनुषंगिक बाबी अस्तित्वात आहेत की नाही हेसुद्धा पाहावे लागते.

साहजिकच काही वर्षांपूर्वी जेव्हा केंद्र सरकारने पर्यावरणपूरक विद्युत वाहनांना प्रोत्साहन देण्याचे धोरण जाहीर केले होते तेव्हा ही वाहने ज्या विद्युत ऊर्जेवर चालतात ती विद्युत ऊर्जा पुरेशा प्रमाणात आणि सोयीस्कररित्या उपलब्ध आहे की नाही याचा विचार झाला नाही. म्हणूनच आजपर्यंत विद्युत वाहनांना अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. आता राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयाप्रमाणे वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन उभारण्याला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. राज्य व राष्ट्रीय महामार्गावर प्रत्येकी २५ किलोमीटर अंतरावर चार्जिंग सुविधा उभारली जाणार आहे. पण सरकारच्या ही गोष्ट खूप उशिरा लक्षात आली.

आजपर्यंत जेवढ्या प्रमाणात विद्युत वाहनांची विक्री झाली त्या सर्व वाहन मालकांना आपल्या वाहनांचे चार्जिंग करताना गैरसोयच सहन करावी लागत होती हे वास्तव आहे. जेवढ्या मोठ्या प्रमाणात आणि मोठ्या संख्येने आज पेट्रोल, डीझेलचे पंप उपलब्ध आहेत, त्याच्या तुलनेने इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन्स खूपच कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. ही गोष्ट लक्षात घेऊनच सर्वसामान्य नागरिक इलेक्ट्रिक वाहनांकडे वळण्यापूर्वी हजार वेळा विचार करत आहे.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे आता इलेक्ट्रिक वाहनांचे धोरण जाहीर झाल्यानंतर किंवा केंद्र सरकारने जेव्हा इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला, त्यानंतर निर्माण झालेल्या रहिवासी इमारतींमध्ये पार्किंग स्पेसमध्ये किंवा अन्यत्र चार्जिंगची सुविधा जरी उपलब्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला असला तरी त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या लाखो इमारतींमध्ये राहणार्या सर्वसामान्य नागरिकांसाठी मात्र अशा प्रकारची सुविधा निर्माण करणे हे एक मोठे आव्हान आहे. साहजिकच प्रवासाला सुरुवात करण्यापूर्वी आपले वाहन घरातल्या घरात चार्जिंग करणे अशक्य आहे. प्रवासाला सुरुवात केल्यानंतरसुद्धा वाहनांचे चार्जिंग स्टेशन शोधणे हा एक मनस्तापाचा विषय झाला आहे.

मोठ्या उत्सुकतेने इलेक्ट्रिक वाहने खरेदी करणार्यांचे हे अनुभव इतरांनी ऐकल्यामुळेच अनेकांनी या वाहनांकडे पाठ फिरवली हेसुद्धा या निमित्ताने लक्षात घ्यावे लागणार आहे. साहजिकच आता राज्य मंत्रिमंडळाच्या या निर्णयानंतर इलेक्ट्रिक वाहनांच्या खरेदीसाठी योग्य प्रकारची पार्श्वभूमी तयार होईल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे योग्य प्रमाणात चार्जिंग स्टेशन उपलब्ध होतील अशी आशा करावी लागेल. राष्ट्रीय किंवा राज्य महामार्गावर टोलमाफी देणे किंवा वाहन नोंदणी नूतनीकरणात सवलत देणे या जर सर्वसाधारण गोष्टी असल्या तरी चार्जिंग स्टेशनची उपलब्धता हा सर्वात महत्त्वाचा विषय आहे.

आता राज्य सरकारने आपल्या या धोरणामध्ये जाहीर केल्याप्रमाणे त्वरित आणि जलदगतीने राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावर इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशनची उपलब्धता करण्यास प्राधान्य द्यायला हवे. देशातील महानगरांमध्ये जेवढ्या मोठ्या प्रमाणात सध्या वाहनांच्या धुरामुळे प्रदूषण निर्माण होत आहे आणि या प्रदूषणामुळे निर्माण होणारी रोगराई किंवा इतर अनुषंगिक समस्या यांचा विचार करता आणि या समस्यांवर होणार्या खर्चाचा विचार करता सरकारला प्राधान्याने आता पर्यावरणपूरक वाहनांना सोयी सवलती उपलब्ध करून द्याव्या लागतील.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे इलेक्ट्रिक वाहनांच्या खरेदीसाठी सर्वसामान्य नागरिकांचे अधिक जास्त प्रमाणात प्रबोधन होणे गरजेचे आहे. अजूनही अनेकांच्या मनात या वाहनांबाबत साशंकता आहे. आता महाराष्ट्र सरकारने तरी किमान आपल्या ईव्ही धोरणाचा एक भाग म्हणून सर्वसामान्य नागरिकांच्या मनातील शंका दूर करण्यासाठीसुद्धा काही प्रबोधन करण्याची गरज आहे.

जगाच्या पाठीवरील काही देशांमध्ये सध्या फक्त इलेक्ट्रिक वाहनांचा वापर केला आहे आणि तेथील पर्यावरणामध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे, हे पाहता महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यामध्ये राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणीसुद्धा करून राज्यात पर्यावरणपूरक सकारात्मक वातावरण तयार करण्याच्या दिशेने पावले उचलण्याची गरज आहे.

# महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या क्षेत्रीय कार्यालयात स्थापना दिन साजरा

## बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या हस्ते स्थापना दिनाच्या फलकाचे अनावरण

**गेवराई । प्रतिनिधी**

**भारत सरकारच्या एक राज्य एक ग्रामीण बँक या धोरणास अनुसरून महाराष्ट्र ग्रामीण बँक आणि विदर्भ कोकण ग्रामीण बँक यांचे एकत्रीकरण करून नवीन महाराष्ट्र ग्रामीण बँकेची स्थापना दि. ०१ मे २०२५ पासून सुरुवात झाली असून त्यानिमित्ताने महाराष्ट्र ग्रामीण बँक क्षेत्रीय कार्यालय, बीड येथे स्थापना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत उपस्थित होते.त्यांच्या हस्ते स्थापना दिनाच्या फलकाचे अनावरण करण्यात आले आणि दीप प्रज्वलन करुन कार्यारंभ दिवस तथा स्थापना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.**



महाराष्ट्र ग्रामीण बँकेचा स्थापना दिनाचा मुख्य कार्यक्रम छत्रपती संभाजीनगर येथील मुख्य कार्यालयात आयोजित करण्यात आला होता तसेच या कार्यक्रमाचा भाग म्हणून बीड येथील क्षेत्रीय कार्यालयात स्थापना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रस्तावित डीआरएम हर्षल कुऱ्हाडे यांनी केले. तसेच क्षेत्रातील मान्यवर ग्राहकांचा सत्कार या प्रसंगी करण्यात आला. या प्रसंगी सिरसाळा शाखेचे शाखा व्यवस्थापक एस एस जाधव यांनी उपस्थितांना ग्रामीण बँकेच्या सेवा सुविधांमध्ये वाढ होणार असल्याचे नमुद केले. सेवानिवृत्त अधिकारी तांदळे यांनी ग्रामीण बँकेच्या सेवांचा गौरव केला. या वेळी काही ग्राहकांनी आपल्या कर्मचाऱ्यांचे विशेष गुणगौरव करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचा समारोप ग्रामीण बँकेचे क्षेत्रीय व्यवस्थापक शिवशंकर लाईदवार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना सांगितले की, महाराष्ट्र ग्रामीण बँकेत यापुढे अनेक सेवा आणि सुविधा ग्राहकांना मिळणार असून आमचे कर्मचारी देखील ग्राहक सेवा तत्पर आणि चांगली देतील अशी खात्री त्यांनी यावेळी बोलताना दिली. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. यावेळी ग्रामीण बँकेचे शाखा अधिकारी आणि कर्मचारी तसेच सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन उमेश वाघ यांनी तर आभार प्रदर्शन विवेक भोसले यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बीड क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच शैलेश शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शिरूर घाट येथे दारूबंदीसाठी ग्रामपंचायतचा ठराव



**नांदूर घाट । प्रतिनिधी**

**बीडच्या केज तालुक्यातील शिरूर घाट येथे गेल्या वर्षभरात सात ते आठ लोकांचा दारू पिल्याने मृत्यू झाला. त्यानंतर गावातील काही सुशिक्षित तरुणांनी एकत्र येत महाराष्ट्र दिनाच्या दिवशी झालेल्या ग्रामसभेत. दारूबंदी संदर्भातला ठराव मांडला. पाठव एकमताने मंजूर करण्यात आला आहे.**

गाव परिसरात काही ठिकाणी दारूचे ठेके आहेत. त्या ठिकाणी अवैधरीत्या दारूची विक्री केली जाते. अशी माहिती गावकऱ्यांनी दिली आहे. दारूबंदीच्या ठरावावर तात्काळ कार्यवाही न झाल्यास उपोषणाचा इशारा गावातील तरुणांनी आणि महिलांनी दिला आहे. ग्रामपंचायत या ठराव घेण्यासाठी अनुमोदन व सूचक म्हणून गणेश उगलमुगले (तरूण ग्रामस्थ) फुलचंद गिते (ग्रामस्थ) ठराव मांडला त्यानंतर ग्रामपंचायत मध्ये सरपंच उपसरपंच व सदस्यांच्या उपस्थितीमध्ये दारूबंदीचा ठराव पारित करण्यात आला.

# पंधरा दिवसांच्या जलव्यवस्थापन मोहिमेत आष्टी चे जलसंपदा सर्वोत्तम

**आष्टी । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभाग,जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जल व्यवस्थापनाची चळवळ लोकचळवळ व्हावी तसेच जलसाक्षरता ता निर्माण व्हावी,यासाठी " जल व्यवस्थापन कृती पंधरवाडा" १५ एप्रिल ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत राज्यभर जलसंपदा विभाग यांनी राबविण्यात आला होता.या उपक्रमातंर्गत बीड जिल्हयातील सर्व अकरा तालुक्यांमधून आष्टी उपविभागाने उकृष्ट कार्य करून बीड जिल्ह्यात सर्वात्तम येण्याचा मान पटकावला आहे.**

गेल्या १५ ते ३० एप्रिल पर्यंत राज्यशासनाने जल व्यवस्थापन पंधरवडा संपुर्ण राज्यात आयोजित केला होता.यामध्ये जल व्यवस्थापनावरील पंधरा दिवस विविध उपक्रम राबवले गेले जलसाक्षरता ही लोकचळवळ उभी राहावी,यासाठी जल व्यवस्थापनाचे महत्व नागरिकांपर्यंत पोचवण्यात आले.यासाठी बीड जिल्ह्यातील अकरा तालुक्यातील जलसंपदा विभागाने कंबर कसली व पाण्याचे महत्व सांगत जनजागृती केली.या जिल्ह्यातील ११ तालुक्यामधून आष्टी तालुका जलसंपदा विभागाने उत्कृष्ट कार्य केले असल्याने त्यांचा सन्मान (दि.१ मे) रोजी अभियंत्य व अधिक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण बीड पल्लवी जगताप,कार्यकारी अभियंता,जायकवाडी पाटबंधारे



विभाग के ३ बीड विनायक नखाते यांच्याहस्ते उपविभागीय अधिकारी पाटबंधारे उपविभाग आष्टी विजय पाखरे यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी शाखाधिकारी ओम डोके,ज्ञानेश्वर देशमुख पाटबंधारे उपविभाग आष्टी व व्या अंतर्गन सर्व अधिकारी/कर्मचारी वृंद यांनी अथक मेहनत घेतली.सलग पंधरा दिवस विविध उपक्रम व जनजागृती मोहिमा राबवून जल जलव्यवस्थापनचे स्वरूप दिले.यामुळेच व्यवस्थापनाला आष्टी तालुक्याला हे प्रथम पारितोषिक मिळाले असल्याचे विजय पाखरे यांनी सांगितले.

# हिंदू मुस्लिम ओबीसी, भटके-विमुक्त संघर्ष समिती स्थापन

## जिल्हाध्यक्षपदी डॉ. जाधव तर शहराध्यक्ष खुर्शीद आलम

**बीड । प्रतिनिधी**

**आज शनिवार दि.३/५/२०२५ रोजी शासकीय विश्रामगृहात हिंदू मुस्लिम समाजातील ओबीसी,भटक्या-विमुक्त जाती सर्व ओ.बी.सी. जमातीतील प्रमुख पदाधिकारी यांची बैठक संपन्न झाली.**



यावेळी केंद्र सरकारने देशातील सर्व धर्मांची जातिनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतलाय या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील हिंदू मुस्लिम ओबीसी भटके-विमुक्त समुहातील सर्वच विविध समाजातील प्रमुख पदाधिकारी यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.तसेच अनेक वर्षांपासून प्रलंबित मागण्या असलेले पश्न जसे की ओबीसी,भटके-विमुक्त जाती जमातींचे पदोन्नतीतील आरक्षण, क्रीमिलिअरची अट रद्द करणं,या समुहातील प्रत्येक जातींचे आर्थिक महामंडळ स्थापन करण्यात यावे, राज्यघटनेने दिलेल्या अधिकारानुसार आयोग, समित्या, कमिटयांच्या शिफारशी लागू करण्यात याव्यात, केंद्र व राज्य सरकारच्या मागासवर्गीयांच्या साठीच्या शासकीय योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न करणं, प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृह बांधणे,जातीचे प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र यातील जाचक अटी रद्द करण्यात याव्यात व इ.अश्या अनेक सामाजिक, शैक्षणिक अडिअडचणी विषयावर सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी ओबीसी भटके-विमुक्त समुहातील अनेक जातींचे प्रमुख उपस्थित होते. यावेळी हिंदू मुस्लिम ओबीसी, भटके-विमुक्त संघर्ष समिती स्थापन करण्यात आली व त्या समितीच्या बीड जिल्हाध्यक्षपदी डॉ.लक्ष्मण जाधव यांची तर खुर्शीद आलम यांची शहराध्यक्ष म्हणून सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच जिल्हा उपाध्यक्षपदी मनोज चव्हाण, कार्याध्यक्ष सय्यद फारुख मनियार, सहसचिव विजय गायकवाड, उपाध्यक्ष रफिक कुरेशी, संघटक शेख जाकेर, सहसंघटक अशोक दुधाड, उपाध्यक्ष शफिक तांबोळी, कोषाध्यक्ष वसंतजी अलकुंटे तर मार्गदर्शक म्हणून सुभाषजी राऊत,प्रकाशजी कानगावकर, हाजी गुलाम जहांगीर आदीची निवडीची घोषणा करण्यात आली. यावेळी मातंग समाजातील नेते अनिलजी चांदणे,ओबीसीचे नेते प्रकाशजी कानगावकर,सन्नी चांदणे,हाशम बागवान, डॉ.अडागळे संतोष, कैकाडी समाजाचे युवक नेते विजयजी गायकवाड, अक्साद मंसुरी, वडार समाजाचे नेते वसंतजी अलकुंटे , मसणजोगी समाज अध्यक्ष हनुमंत मोरे,मांगगारुडी समाजाचे प्रभाकर हतागळे आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी माळी,साळी, छप्पर बंद, टकारी, वडार, मनियार, लोहार, मोमीन, कुरेशी, मातीवडार, तांबोळी, लोहार, मन्यार, शहा,कैकाडी, छप्परबंद, भावसार,खाटीक, मुस्लिम भंगी,ओतारी, रामोशी, बागवान, मुल्ला मुलानी, मांग गारुडी, मसणजोगी, फकिर, अत्तार, आदी समाजातील प्रमुखांची उपस्थित होती.

## पान १वरून...

### संपूर्ण महाराष्ट्राला अवकाळी

गेल्या आठवडाभरापासून विदर्भातील काही जिल्ह्यांना अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला होता. राज्यात बहुतांश ठिकाणी तापमानाचा पारा प्रचंड वाढला आहे. दि. ३ मेपासून पुढील पाच दिवस बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता आहे. अवकाळी पावसाची शक्यता असली तरी तापमानाचा पारा ४० च्या पुढेच असल्याची नोंद होत आहे. प्रचंड उकाडा वाढला आहे. नागरिकांना घराबाहेर पडताना धडकी भरेल एवढं तापमान नोंदवला जात असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. गेल्या चार ते पाच दिवसांपासून सोलापूर मध्ये तापमान ४५ अंशांच्या उंबरठ्यावर आहे. विदर्भात पावसाचा इशारा असला तरी ४२ ते ४५ अंशापर्यंत तापमान टेकलं आहे. मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात गेल्या तीन-चार दिवसांपासून कमाल तापमान ४० ते ४५ अंशापर्यंत गेले आहे. अनेक भागांमध्ये दुपारच्या वेळी शुकशुकाट असून रस्ते ओस पडले आहेत.

------------

### पुढचे मुख्यमंत्री

प्रमाणात होणे गरजेचे आहे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे देवेंद्र फडणवीस समर्थकांच्या गोटात चांगलीच खळबळ माजली आहे.

-------------

### शिर्डीच्या साईबाबा मंदिराला

झाला होता. हा मेल मिळताच संस्थानच्या सुरक्षा अधिकाऱ्यांनी शिर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पोलिसांनीही प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल केला आहे. हा मेल नेमका कोणी केला? याचा पोलीस कसून शोध घेत आहेत. मंदीर उडवून देण्याची धमकी मिळाल्यानंतर शिर्डीमध्ये भाविकांच्या सुरक्षेची विशेष काळजी घेण्यात येत आहे. साईबाबा संस्थानसह हजारो पोलीसांचा ताफा येथे सज्ज ठेवण्यात आला आहे. साईभक्तांनी कोणतीही भीती न बाळगता दर्शनासाठी यावे, असे आवाहन साईमंदिर प्रशासनाने केले आहे.

**यंत्रणा सतर्क, कसून तपासणी**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरात वातावरण ढवळून निघाले आहे. आणखी अनुचित प्रकार घडू नये म्हणून संपूर्ण यंत्रणा सतर्क झाली आहे. असे असतानचा आता शिर्डीतील साई मंदिराला धमकीचा मेल प्राप्त झाल्याने सर्व सुरक्षा यंत्रणा अलर्ट झाल्या आहेत. मंदिराच्या संस्थानाने नेमकं काय सांगितलं?

--------------

### आगे कुटूंबीयांना न्याय मिळवून

आई, पत्नी व मुलीची जबाबदारी घेतली. गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या मदतीचा धनादेश यावेळी आगे परिवाराला देण्यात आला. भाजपचे जिल्हा विस्तारक स्व बाबासाहेब आगे यांची काही दिवसापूर्वी हत्या झाली होती. त्यांच्या दुर्दैवी मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबीयावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे, अजूनही या दुःखातून ते सावरले नाहीत. मध्यंतरी ना. पंकजाताई मुंडे बीड दौर्यावर आल्या होत्या, त्यावेळी त्यांनी या परिवाराचे दूरध्वनीवरून सांत्वन केले होते व पुढील दौऱ्यात येऊ असे सांगितले होते. त्यानुसार आज त्यांनी किट्टी आडगाव येथे जाऊन आगे यांच्या आई, पत्नी व त्यांच्या चिमुकलीची भेट घेतली व सांत्वन केले.

**आगे यांची मी मोठी बहिण, त्यांचं दुःख मलाही**

.स्व. बाबासाहेब आगे एक धडाडीचा कार्यकर्ता होता, त्यांच्या जाण्याने मलाही खूप दुःख झाले आहे, ते मला भावासारखे होते.त्यांचं कुटुंब स्वाभिमानी आहे, त्यांचा स्वाभिमान कायम ठेवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी जी काही मदत लागेल ती मी जरूर करेन. गरज पडली तर सुप्रीम कोर्टापर्यंत लढा देण्यासाठी प्रयत्न करू अशा शब्दांत धीर देत ना. पंकजाताईंनी आगे यांच्या पत्नी व मुलीची जबाबदारी स्वीकारत असल्याचे म्हटले.

**ज्या गावात अडवले, तिथं ग्रामस्थांनी केलं नजरेनं स्वागत**

लोकसभा निवडणुकीत प्रचाराच्या वेळी ना. पंकजाताईंना किट्टी आडगाव येथे अडवून गोंधळ घालण्याचा प्रयत्न झाला होता. आज त्याच गावात ना. पंकजाताई मुंडे गेल्या. त्या येणार असल्याने ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती, लोकं रस्त्याच्या दोन्ही बाजूने थांबले होते. कार्यकर्त्यांच्या कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी आलेल्या ना. पंकजाताईंचे रस्त्यावर उभा असलेल्या ग्रामस्थांनी केवळ एका नजरेने स्वागत केले, तशा छटा त्यांच्या चेहर्यावर यावेळी दिसून आल्या.

--------------

### महाराष्ट्रदिनाच्या ध्वजारोहनाला २२

दिनांक १ मे २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमीत्त पोलीस मुख्यालय बीड येथे आयोजित मुख्य शासकीय ध्वजवंदन कार्यक्रमास २२ अधिकारी अनुपस्थित होते. त्यामुळे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे परिपत्रक क्र. सोईआर-२०२५/प्र.क्र. १४९/राशी-१ दिनांक २८.०४.२०२५ नुसार नोटीस बजावण्यात आहे. सदर आपल्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली आहे. सदर कार्यक्रम शासकीय व संस्थात्मक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा असून सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांची उपस्थिती अनिवार्य आहे, याची आपल्याला पूर्वसूचना देण्यात आलेली होती. आपण सदर कार्यक्रमाला जाणीवपुर्वक अनुपस्थित राहून निष्काळजीपणा केल्याचे सकृतदर्शनी दिसून आले असून आपली सदरची कृती ही कार्यालयीन शिस्तीचा भंग करणारी तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ चे नियम ३ चा भंग करणारी आहे, असे नोटिसीमध्ये नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील विहीत तरतुदीनुसार शिस्तभंग विषयक कारवाई करण्यासाठी नियुक्ती प्राधिकारी यांच्याकडे का प्रस्तावित करण्यात येवू नये, या बाबत आपला लेखी खुलासा ही नोटीस मिळालेपासून ४८ तासाच्या आत समक्ष हजर राहून लेखी स्वरुपात सादर करावा. अन्यथा आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही अनुसरण्यात येईल याची नोंद घ्यावी, अशी नोटीस देण्यात आल्यामुळे खळबळ उडाली आहे. पुढील अधिकाऱ्यांना उपस्थित न राहिल्याबद्दल नोटीस बदलण्यात आली आहे. जिल्हा उपनिबंधक, सहनिबंधक जिल्हा उपनिबंधक कार्यालय बीड, सहाय्यक नियंत्रक वैद्यमापन कार्यालय, महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, व्यवस्थापक अग्रणी बँक, जिल्हा कामगार अधिकारी, प्राचार्य आयटीआय बीड, व्यवस्थापक नेहरू युवा केंद्र बीड, सहाय्यक संचालक नगर रचनाकार बीड, वरिष्ठ वैज्ञानिक भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, कार्यकारी अभियंता बांधकाम नंबर दोन जिल्हा परिषद बीड, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय बीड, विभागीय वन अधिकारी, सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन बीड, मुख्याधिकारी नगर परिषद बीड, जिल्हा महिला बाल विकास, कार्यकारी अभियंता जायकवाडी क्रमांक तीन, कार्यकारी अभियंता लघु सिंचन, शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी बीड, उपसंचालक, जिल्हा सांख्यिकी अधिकारी आदी २२ कार्यालय प्रमुखांना नोटीस देण्यात आले आहे.

--------------

### लाडक्या बहिणींना एप्रिलचा

जमा करण्यात येत असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, एप्रिल महिन्याचा हफ्ता लाडक्या बहिणींना साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने त्यांच्या खात्यात जमा होणार असे सांगण्यात आले होते. मात्र मात्र अक्षय्य तृतीयेलाही एप्रिल महिन्याचा हफ्ता लाडक्या बहिणींच्या खात्यावर आला नसल्याने लाडक्या बहिणींची निराशा झाली होती. यानंतर दोन दिवसांपूर्वीच महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरेंनी एप्रिल महिन्याचा हफ्ता लवकरच जमा होईल असे सांगितले होते आणि शनिवारपासून लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे जमा होत आहेत.

-------------

### सोनं १९ हजारांनी

तब्बल १९ हजारांनी स्वस्त होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सोन्याने काही दिवसांपूर्वी प्रति तोळा १ लाख रुपयांचा आकडा पार केला होता. आता मात्र सोने साधारण ७ ते ८ हजारांनी कमी झालेले आहे. असे असतानाच आगामी चार ते सहा महिन्यांत सोन्याचा भाव ऑल टाईम हायवरून थेट १९ हजारांनी कमी होऊ शकतो. केडिया ॲडव्हायजरीचे संचालक अजय सुरेश केडिया यांनी आगामी चार ते सहा महिन्यांत सोनं ८० हजारांपर्यंत कमी होऊ शकतं अशी शक्यता व्यक्त केली आहे. सोन्याचा भाव भविष्यात ८० ते ८५ हजार प्रति दहा ग्रॅम होण्याची शक्यता आहे, असं भाकित त्यांनी केलंय. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताच्या आयात करारात वाढ केल्यामुळे सोन्याच्या भावात ही वाढ झाली होती. ट्रम्प यांनी आयात कराराबाबत थोडी वेगळी भूमिका घेतल्यानंतर आता जागतिक बाजारात स्थिरता पाहायला मिळत आहे. त्याचाच परिणाम म्हणून सोन्याच्या भावातही घसरण झाली होती. त्यामुळे ही सर्व परिस्थिती पाहता आगामी काळात सोन्याचा भाव ८० हजारांपर्यंत कमी होऊ शकतो, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

-------------

## ह.भ.प.अतुलशास्त्री महाराज यांची नागऱ्याचीवाडी येथे श्रीमद् भागवत कथा

बीड । प्रतिनिधी



शिरूर कासार तालुक्यातील मौजे नागऱ्याचीवाडी येथे शुक्रवार दिनांक ०२ एप्रिल ते ०९ एप्रिल २०२५ पासुन तागडगाव येथील संत भगवानबाबा संस्थानचे महंत तथा श्रीमद भागवत कथाकार रामायणाचार्य ह.भ.प. अतुलशास्त्री महाराज यांच्या श्रीमद भागवत कथा ज्ञान सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे.

नागऱ्याचीवाडी येथे आयोजित करण्यात आलेल्या सदरील भव्य दिव्य भागवत कथा सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. कथेची दुपारी २.०० ते ५.०० या वेळात आयोजित करण्यात आली आहे. गौरव झुंजे, पैठण, कृष्णा महाराज पाटील, अविनाश म. पाटील, कृष्णा महाराज सानप हे साथ संगत करणार आहेत.सदरील भागवत कथेचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.


# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार, दि. ०४ मे २०२५




# प्रबोधनपर चळवळीतील कलावंतांनी प्रस्थापित व्यवस्थेला जाब विचारला -मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**गुलामीच्या व्यवस्थेला मुहंतोड जवाब देण्याचं काम तत्कालीन प्रबोधनपर चळवळीतील कलावंतांनी, शाहिरांनी आणि गायकांनी करून प्रस्थापित व्यवस्थेला जाब विचारला त्यामुळे खचलेल्या, पिचलेल्या, उपेक्षित, वंचित समाजाला नवीन प्रेरणा आनि जगण्याचं बळ मिळालं आणि समाजाला योग्य दिशा देण्याचे काम कलाकारांनी त्यावेळी केले असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांनी केले. न्यूज लोकमन व प्रयास सेवाभावी संस्थेतर्फे आयोजित एक शाम, भीम के नाम या संगीत रजनीचे उद्घाटन करताना डॉ.राजेश इंगोले हे बोलत होते.**

यावेळी विचारमंचावर उपप्राचार्य गौतम गायकवाड, प्रा.अनिल नरसिंगे, माजी नगराध्यक्ष लंकेश वेडे, दीपक वैद्य, पंकज मस्के, सचिन देवकर यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.इंगोले यांनी क्रांती आणि प्रतिक्रांती या एकाच वेळी एकाच गतीने एकाच दिशेला जात असतात क्रांतीला बळ देण्याचे काम कलाकारांनी युगानूयुगे केलेले आहे. हा इतिहास कलाकारांनी विसरला नाही पाहिजे असे सांगत सामाजिक बांधिलकी पाळत समाजासाठी प्रबोधनाचे कार्य कलाकारांनी अविरतपणे सुरू ठेवले पाहिजे अशी अपेक्षा व्यकत केली. पत्रकार संजय गायकवाड व प्राध्यापक महादेव माने यांनी सामाजिक बांधिलकी जपत अंबाजोगाईतील गायक कलाकारांसाठी हे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आणि



जनप्रबोधनाचे कार्य केले आहे त्याबद्दल डॉ.इंगोले यांनी त्यांचे अभिनंदन केले. ज्या गोष्टी समजून सांगायला सामाजिक कार्यकर्त्यांना खूप वेळ लागतो, कलाकार दोन ओळीच्या गाण्यांमधून ते प्रबोधन आणि समुपदेशन प्रभावीरीत्या करू शकतात असे वक्तव्य डॉ.राजेश इंगोले यांनी केले. सत्कारमूर्ती उपप्राचार्य गौतम गायकवाड यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य समाजासाठी अतुलनीय होते आणि हे कार्य समाजापुढे गाण्याच्या रूपाने मांडण्याचे काम कलाकार करीत आहेत ही गौरवाची गोष्ट आहे असे सांगत न्यूज लोकमन आणि प्रयास सामाजिक सेवाभावी संस्था यांनी आपला सत्कार केला त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले. यावेळी उपप्राचार्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल प्रा.गौतम गायकवाड तसेच साधू गायकवाड व लंकेश वेडे यांची मुलं डॉक्टर झाल्याबद्दल त्यांचा ही सत्कार डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते करण्यात आला तसेच लक्ष्मण गायकवाड या श्रमिकाचा मुलगा भारतीय लष्करात चांगल्या हुद्द्यावर रूजू झाला त्याबद्दल त्यांचाही सत्कार डॉ.राजेश इंगोले यांच्या तर्फे करण्यात आला. यावेळी उपनिरीक्षक रमेश शिरसाठ, डॉ.राजेश इंगोले लंकेश वेडे यांच्यातर्फे ही भीम संगीत रजनी आयोजित केल्याबद्दल आयोजक न्यूज लोकमनचे संपादक संजय जोगदंड तसेच प्रयास सामाजिक सेवाभावी संस्थेचे प्रा.महादेव माने यांचा सहृदय सत्कार करण्यात आला. या भीम संगीत रजनीसाठी अंबाजोगाईचे स्थानिक कलाकार शाहीर गणेशमामा काळे, शाहीर तुकाराम सुवर्णकार सुप्रसिद्ध गायिका विद्या बनसोडे, प्रा.महादेव माने, बळीराम उपाडे, प्रा.राजकुमार ठोके, राहुल सुरवसे, प्रदीप चोपणे तसेच डॉ.राजेश इंगोले यांनी आपापली भीमगीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक न्यूज लोकमनचे संपादक संजय जोगदंड यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.महादेव माने यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध शाहीर गणेश मामा काळे यांनी केले. तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मल्हारी जोगदंड, लखन जोगदंड, राहुल जोगदंड, माऊली नरसिंगे, शंकर गायकवाड, विशाल नरसिंगे व इतर कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

पान ६ वरून...

### महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीसमुळे

मागासलेपणा च्या आधारावर वर्गीकरण करून जात निहाय जनगणना आर्थिक सर्वेक्षणा च्या नियमानुसार सर्व बाबी तपासून सर्व जाती धर्मातील वंचित आदिवासी मागासवर्गीय अल्पसंख्यांक ओबीसींना न्याय देण्याचा जातीनिहाय जनगणमध्ये प्रयत्न केला गेला परंतु २०१४ नंतर देशात व राज्यात आरएसएसच्या विचारधारेचे बीजेपी सरकार आल्यावर जातनिहाय जनगणना संदर्भात उच्च व सर्वच न्यायालयात वेगवेगळ्या मुद्द्याखाली याचिका दाखल करून दीड टक्क्याची त्रुटी काढून सरकारने आरक्षणासंदर्भात निर्णय झालेला असताना रद्द करण्यात चे आदेश शासन स्तरावर काढण्यात आले असून तसा पत्र व्यवहार शासनाकडून सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेला आहे . त्यामध्ये दिनांक १२ जून २०१८ ला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी केंद्र सरकारकडे गोपनीय पत्र देऊन जात निहाय जनगणनेला विरोध केल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला आहे.

### छगन भुजबळ यांच्या समता

त्यानंतर देशाभरातील तब्बल १०० खासदारांचा भक्कम पाठिंबा मिळाला.या पाठपुराव्याचा परिणाम म्हणून तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री स्व.प्रणव मुखर्जी यांनी जातनिहाय जनगणनेची घोषणा केली परंतु तेव्हा नगरविकास व ग्रामविकास खात्यामार्फत केवळ सर्वेक्षण करण्यात आले.नंतरच्या काळात देशात मोदी सरकार आल्यानंतर पुन्हा या मागणीसाठी ओबीसीचे नेते राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ साहेब यांनी पाठपुरावा सुरु केला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे देखील पत्राद्वारे, तसेच व्यक्तिगत रीत्या ही मागणी मांडली होती.आता संपूर्ण देशात जातनिहाय जनगणना होणार असल्याने ही संपूर्ण देशातील सर्व प्रवर्गातील मागास घटकांसाठी आनंदाची बाब आहे.आष्टी शहर व तालुक्यातील समता सैनिकांनी मोठ्या उत्सहात या निर्णयाचे स्वागत केले आहे.

### अनिल जगताप यांच्या

करणारे कार्यकर्ते असून, ओबीसी व व्हिजेएनटी समाजाच्या हक्कांसाठी नेहमी पुढाकार घेत आले आहेत. त्यांच्या या नियुक्तीमुळे स्थानिक पातळीवर ओबीसी आणि व्हिजेएनटी समाजाला नवी दिशा व बळ मिळेल, असा विश्वास पक्षाने व्यक्त केला आहे. धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची निष्ठा व संघटन कौशल्य, तसेच शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा वारसा हे प्रेरणास्थान मानून, अशोक दुधाळ हे पक्षवाढीच्या कामात स्वतःला झोकून देतील आणि सर्व घटकांना बरोबर घेऊन प्रभावीपणे कार्य करतील, अशी अपेक्षा वरिष्ठ नेतृत्वाकडून व्यक्त करण्यात आली आहे.

नियुक्तीनंतर अशोक दुधाळ यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, ''ही जबाबदारी मोठी असून, पक्ष नेतृत्वाने दाखवलेल्या विश्वासाला मी पात्र ठरेल. समाजाच्या न्याय हक्कांसाठी मी संघर्ष करत राहीन आणि शिवसेनेच्या ध्येयधोरणांनुसार कार्य करीन.''

### वंजारवाडी गावातील जो

समाजसेवक पांडुरंग नाना राख, ग्रामपंचायत अधिकारी दिपक लांडे, अंकुश आण्णा खाडे, दिलिप खाडे, अंकुश तांदळे, आजिनाथ खाडे, नागरगोजे सर, भारती मॅडम, नागरगोजे मॅडम, भुतकर सर, जाधव सर, आंधळे सर, डोंगरे सर, वनवे मॅडम, कुटे मॅडम, तांदळे मॅडम, राख मॅडम, मोराळे मॅडम, कुटे मॅडम, घरत सर, तांदळे सर, बेग सर, नागनाथ सातपुते, तात्याराम बाप्पु, नंदु पवळ, दिनकर तांदळे, सौ. सुरेखा घोडके उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी बिनवडे सर, हानुमंत दादा तांदळे, प्रदिप बाप्पु तांदळे, वाघमारे डि.डि. लक्ष्मण शेंडगे यांणी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन लोमेश तांदळे सर यांणी केले.

### स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज

तरी भाविक भक्तांनी या किर्तनाचा व भागवत कथेचा लाभ घ्यावा असे आवहन करण्यात आले आहे . सप्ताहात बंकटस्वामी संस्थान करणार मुलींचे ''कन्यादान'' बंकटस्वामी संस्थांच्या वतीने यावर्षी विवाह सोहळा आयोजित करण्यात येणार आहे, सप्ताहाच्या आठ दिवसाच्या कालावधीत बंकटस्वामी संस्थान लग्नाचा खर्च उचलून संसार उपयोगी साहित्य देऊन कन्यादान करणार असल्याने परिसरातील इच्छुक वर वधू पित्यांनी याचा लाभ घेऊन आपल्या मुला मुलींचे विवाह सप्ताहात करण्याचे आवाहन ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे विश्वस्त व अन्नदान कमिटी, ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## जालना बाजार समितीच्या सचिवपदी अनिल खंडाळे

**जालना । प्रतिनिधी**

**जालना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव मोहन राठोड हे नियत वयोमानानुसार दि. ३० एप्रिल रोजी सेवानिवृत्त झाल्याने रिक्त सचिव पदावर बाजार समितीचे अनिल खंडाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**



कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयात मोहन राठोड यांचा निरोप समारंभतसेच नवनिर्वाचित अनिल खंडाळे यांच्या सचिवपदी नियुक्तीचा समारंभ पार पडला. यावेळी बाजार समितीचे मुख्य प्रशासक आ. अर्जुनराव खोतकर यांनी मोहन राठोड व अनिल खंडाळे यांचा सत्पनीक सत्कार केला. यावेळी बोलतांना आ. अर्जुनराव खोतकर म्हणाले की, बाजार समितीच्या विकासामध्ये श्री. मोहन राठोड व श्री. अनिल खंडाळे यांचा मोठा वाटा असल्याचे सांगुन श्री. मोहन राठोड यांनी उत्तम रित्या सचिव पदाचे कामकाज सांभाळले असून तसेच बाजार समितीचे उत्पन्नामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ केली होती असेही आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले, श्री. खंडाळे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देवुन श्री. खंडाळे हे सुध्दा उत्तम रित्या बाजार समितीचे कामकाज सांभाळतील, अशी आशा व्यक्त केली. याप्रसंगी पंडित दादा भुतेकर, बाजार समितीचे प्रशासक तुकाराम खर्जुले, नरसिंग गोरे, संदीप वाघ, संतोष मोहिते, ज्ञानेश्वर शेजुळ, भगवान अंभोरे, विष्णू पाचफुले, , फेरोज लाला तांबोली, गोविंद सराटे, जफर खान, बाजार समितीचे भरत तनपुरे, अजय मिरकड, शिवानंद पालवे, प्रसाद काकडे, संजय जाधव, हार्दिक फलके, प्रफुल हिवरेक, संजय मोठे, ज्ञानेश्वर आधुडे, अक्षय खंडाळे, विश्वंभर गिरी, रामेश्वर बांडे, संकल्प गाडेकर, सुनिल साबळे, आदित्य कुलकर्णी यांच्यासह शेतकरी, व्यापारी, हमाल मापाडी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा गावनिहाय शेतकरी फार्मर आयडी शिबीर आदेशाला नकार

माजलगाव । प्रतिनिधी

शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी शेतकरी फार्मर आयडी काढणे बंधनकारक केले आहे यासाठी गावनिहाय शिबीरे आयोजित केले असे आदेश शासनाने पारित केले आहे या आदेशाला तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी यांनी विरोध दर्शवला असून अशा आशयाचे निवेदन उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले आहे



### उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले निवेदन

या विषयी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,शासनाच्या वतीने महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली व ना.जयकुमार गोरे,ना माणिकराव कोकाटे,राजेश कुमार अवलसचिव, डवले,प्रधान सचिव,सह प्रधान सचिव कृषी यांच्यासह तलाठी, कृषी सहाय्यक, ग्रामपंचायत अधिकारी युनियन अधिकारी सोबत १४ फेब्रुवारी २०२५ रोजी बैठक घेण्यात येऊन या बैठकीत गावनिहाय शेतकरी आयडी काढण्यासाठी शिबीरे घ्यावे असे आदेश पारित करण्यात आले आहेत या कॅम्प साठी ग्रामपंचायत अधिकारी हे कॅम्प आयोजन,ग्रामसभा व आपले सरकार सेवा केंद्र परिचालकाची सेवा उपलब्ध करून देण्यात येईल ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित राहून सहकार्य करतील अशी सविस्तर चर्चा झाली व व तसे आदेश पारित करण्यात आले आहेत परंतु ग्रामपंचायत अधिकारी यांच्या मागे असणारा घरकुल, मग्रारोहयो, घनकचरा व्यवस्थापन व सर्व योजनेचा व्याप या मुळे तालुका ग्रामपचयात अधिकारी यांनी या आदेशाला नकार दिला असून अशा आशयाचे निवेदन काल दिनांक दोन मे रोजी येथील उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन नकार कळविला आहे या निवेदनावर संघटनेचे अध्यक्ष राम यादव सचिव सिरसट आनंदकुमार सह चव्हाण एस एम, उदावंत राजू टकले एनडी कोकाटे नामदेव मानकर डीजे भारतीय एस बी पाचपुते एन के यांच्या सह्या आहेत.



जनजागृती मंडळ जालना व विद्याभारती जालना तर्फे आयोजित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी कार्यशाळा चे दीप प्रज्वलित करून उदघाटण करतांना राजस्थान चे राज्यपाल हरीभाऊ बागडे ,जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ,पुरुषोत्तम बगडिया, डॉ पद्माकर सबनीस आदी

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा फज्जा

### सरकारने केवळ जुन्या उमेदवारांसाठीच मुदतवाढ दिली; नव्या उमेदवारांची निराशा

**पाटोदा । प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना ()'ची गाजावाजा करत घोषणा करण्यात आली होती. या योजनेच्या माध्यमातून १८ ते ३५ वयोगटातील बेरोजगार तरुणांना व्यावसायिक प्रशिक्षण, प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि मासिक विद्यावेतन देण्याचं आश्वासन देण्यात आलं होतं.येणं निवडणूकीच्या तोंडावर तसे आदेश ही दिले.

प्रत्येक अस्थापनेत बेरोजगार नियुक्ती देऊन प्रत्यक्ष कामाचा अनुभव देऊन त्यांची कौशल्यवृध्दी करण्याच्या हेतूने ही योजना सुरू करण्यात आली होती. उमेदवारांना ६,००० ते १०,००० रुपये मासिक विद्यावेतन, व्यावसायिक प्रशिक्षण, आणि शिक्षण शुल्काचे अनुदान देण्याचं वचन दिलं गेलं होतं. पण अनेक ठिकाणी प्रशिक्षणर्थी निवडप्रक्रिया स्पष्टता नसल्यामुळे तसेच पारदर्शकतेच्या अभावामुळे निवडी वादग्रस्त ठरल्या. प्रशिक्षणासाठी संबंधित अस्मानाला कुठला ही पाठयक्रम दिला गेला नाही. कौशल्यवृध्दी कशी होणार आहे हे पण कळू शकले नाही.या निवडी सहा महिन्यासाठी होत्या. सहा महिने पूर्ण झाल्यानंतर त्यांना कार्यमुक्त करून नविन बेरोजगारांना संधी देणे आवश्यक होते परंतु जुन्याचं लोकांना पाच महिने वाढवून दिल्यामुळे अनेक बेरोजगार तरूणांचा हिरमोड झाला आहे.राज्य सरकारच्या 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना'तून बेरोजगार तरुणांना दिलासा देण्याचा दावा करण्यात आला असला, तरी प्रत्यक्षात अनेक जणांच्या अपेक्षांवर पाणी फिरल्याचं चित्र दिसत आहे.सरकारने नुकतीच योजनेतील फक्त जुन्या उमेदवारांसाठीच पाच महिन्यांची मुदतवाढ जाहीर केली आहे, त्यामुळे नव्याने नोंदणी केलेल्या हजारो उमेदवारांच्या आशा धुळीस मिळाल्या आहेत.''नवीन उमेदवारांचं काय? आमचं भविष्य सरकार विसरतंय का?'' असा सवाल अनेक युवक सोशल मीडियावर करत आहेत. प्रशिक्षणाची वाट पाहणाऱ्या उमेदवारांची प्रतिक्षा आणखी लांबणीवर पडली असून, सरकारकडून स्पष्ट दिशानिर्देश न मिळाल्याने संभ्रमाचं वातावरण निर्माण झालं आहे.सरकार फक्त जुन्यांचाच विचार करतंय, मग नवीन उमेदवारांची नोंदणी कशासाठी घेतली गेली होती? बेरोजगार तरूणांची प्रचंड संख्या विचारात घेता सर्वांना संधी देण्यासाठी मुदत वाढ देणे योग्य नव्हते.अश्या संतप्त प्रक्रिया बेरोजगाराकडंन येत आहेत. तरुणांना स्वप्न दाखवून सरकारने त्यांना प्रतिक्षेच्या अंधारात ढकललं आहे, असं मत अनेक तज्ञ व्यक्त करत आहेत. ही योजना पुन्हा एकदा केवळ घोषणांची योजना बनून राहते का, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.सरकार लबाड बोलतय अशी चर्चा सुरू आहे.

# सेवानिवृत्ती म्हणजे नवीन काहीतरी शिकण्याची संधी - बाबासाहेब उजगरे

## मुख्याध्यापिका उम्मेसलमा शेख यांना सेवापूर्तीनिमित्त निरोप

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी तालुक्यातील कन्या वडवणी केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उपळी या शाळेच्या मुख्याध्यापिका शेख उम्मेसलमा अब्दुल रशीद या नियत वयोमानानुसार दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी आपल्या प्रदिर्घ शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या आहेत. त्यांच्या या सेवापूर्तीनिमित्त त्यांना हृदयपूर्वक निरोप देण्यात आला. यानिमित्त वडवणीत सेवापूर्ती सोहळा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**

या कार्यक्रमासाठी मुख्य अतिथी म्हणून शेख मॅडम यांचे माजी विद्यार्थी व विद्यमान स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाईचे सर्जरी विभाग प्रमुख डॉ.नितीन चाटे हे लाभले होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष शिक्षकप्रिय गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे हे लाभले होते. तर प्रमुख अतिथी म्हणून उपळी गावचे सरपंच सचिन हाळकर, उपसरपंच विनायक शेळके, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा रेणुकाताई आडे, उपाध्यक्षा वर्षाताई इचके, कन्या केंद्राचे केंद्रप्रमुख सैलानी शेख सर, वडवणीचे केंद्रप्रमुख सुरेश करांडे सर, चिंचवणचे केंद्रप्रमुख सुनिल मुंडे सर, काडीवडगांवचे केंद्रप्रमुख प्रकाश गांडगे, पिंपरखेडचे केंद्रप्रमुख गणेश धाईतिडक हे प्रमुख अतिथी म्हणून लाभले होते. यांसह सहकारी शिक्षक बांधव, मित्रमंडळी, कौटुंबिक सदस्य व इतर मान्यवर उपस्थित होते. शेख उम्मेसलमा अब्दुल रशीद यांची सन १९८५ साली त्यांची शिक्षण क्षेत्रात प्रथम नेमणूक झाली होती. त्यांनी एकूण तब्बल ४० वर्ष प्रदिर्घ शासकीय सेवा बजावली असून त्यांची संपूर्ण सेवा ही १९८५ ते १९९१ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वकीलवाडी ता.केज, १९९१ ते १९९५ जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा कन्या नेकनुर ता.बीड, १९९५ ते २०१२ जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा कारंजा बीड, २०१२ ते २०१५ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गढी ता.गेवराई ही सेवा सहशिक्षक म्हणून व यानंतर मुख्याध्यापक म्हणून २०१५ ते २०१८ जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा चराटा ता.बीड व २०१८ ते २०२५ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उपळी ता.वडवणी अशी पूर्ण झालेली आहे. आपल्या ४० वर्षांच्या यशस्वी शासकीय कारकीर्दीनंतर त्या आज नियत वयोमानानुसार आपल्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या आहेत. त्यांच्या या सेवापूर्तीनिमित्त वडवणी या ठिकाणी या सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सेवानिवृत्त झालेल्या मुख्याध्यापिका शेख उम्मेसलमा अब्दुल रशीद यांचा त्यांच्या पतीसह शाल, पुष्पहार, पुष्पगूच्छ व जोड आहेर देवून निरोप सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ.नितीन चाटे, ठोंबरे मॅडम, राठोड सर, करांडे सर, धाईतिडक सर, कटारे सर, लांडगे सर यांसह अनेक मान्यवरांनी शेख मॅडम यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदान, विद्यार्थ्यांसाठी घेतलेले कष्ट आणि त्यांच्या नेतृत्वगुणांविषयी व एकंदरीत सेवा कार्यावर प्रकाश टाकला. याप्रसंगी अध्यक्षीय समारोपात बोलतांना गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे म्हणाले की, मुख्याध्यापक म्हणून शेख मॅडम यांनी उपळी येथे २०१८ साली पदभार स्विकारला होता. तेंव्हापासून त्यांनी शाळेच्या भौतिक सुविधांमध्ये आपल्या कार्याने बरेचशी सुधारणा घडवून आणलेली आहे. उपळी सारख्या ग्रामीण भागात काम करतांना आपल्या मितभाषी स्वभावाचा त्यांना बराचसा फायदा झाला. प्रत्येकाचे म्हणणे ऐकून घेणे, संयमाने पुढच्याचे मत जाणून घेणे नंतर आपलं मत व्यक्त करणे असा त्यांचा स्वभाव राहिला आहे. शाळेत काम करत असतांना सर्वांना सोबत घेवून काम करण्याची हातोटी त्यांच्याकडे होती. डोक्यावर बर्फ आणि तोंडात साखर अशी त्यांची काम करण्याची पध्दत आहे. आजचा सेवानिवृत्ती समारंभ हा एक विशेष प्रसंग आहे, जिथे त्यांना त्यांच्या यशस्वी प्रदिर्घ सेवेसाठी सन्मानित करण्यात येत आहे. शेख मॅडम यांनी शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या अध्यापन शैलीमुळे अनेक विद्यार्थी घडले आणि त्यांनी आपल्या कार्याने समाजात एक सकारात्मक बदल घडवला. त्यांच्या समर्पणामुळे शिक्षक, पालक आणि विद्यार्थी वर्गामध्ये त्यांच्याविषयी आदराची भावना आहे. त्यांचे आजवरचे सेवा कालावधीतील आयुष्य हे अतिशय धकाधकीचे व व्यस्त असे गेलेले आहे. सेवानिवृत्ती म्हणजे इथून पुढे फक्त विश्रांती असा त्याचा अर्थ नाही तर आतापर्यंतच्या दगदगीच्या आयुष्यात, नोकरीच्या आयुष्यात जो वेळ तुम्ही तुमच्या कुटुंबीयांना देवू शकला नाहीत, तुम्हाला तुमचा छंद जोपासायला मिळाला नाही, तुमच्या आवडीच्या गोष्टी करायला जो तुम्हाला वेळ मिळाला नाही, त्या गोष्टी करण्यासाठी इथून पुढचा वेळ आहे. इथून पुढच्या आयुष्यात तुम्हाला जे काही चांगलं करायचं आहे मग ते फिरणं असो वाचण्याचा छंद असो पर्यटन असो ते सर्व या पुढील आयुष्यात करुन घ्यावे. तसेच हे असतांना आपले शारीरिक स्वास्थ्य हे देखील कसे उत्तम राहील याकडेही लक्ष द्यावे असा उपयुक्त सल्ला त्यांनी दिला. शेवटी शेख मॅडम यांनी आभारपर मनोगतात आपल्या यशस्वी कार्याचे श्रेय त्यांच्या आई-वडील, कुटुंब, वरिष्ठ अधिकारी, मित्रपरिवार, शिक्षक यांना देवून सर्वांचे आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राजेंद्र चव्हाण सर यांनी केले तर शेवटी सर्व उपस्थितांचे आभार अशोक आवंतकर सर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सविता चव्हाण मॅडम, उज्वला पाटील मॅडम, अमृता सोनटक्के मॅडम, आशाबाई ठोंबरे मॅडम, राजेंद्र चव्हाण सर, सुंदर राठोड सर, किशोर ढवळशंक सर, विष्णू माने सर, अशोक आवंतकर सर, तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उपळी उर्दू या शाळेचे खान अब्दुल रशीद सर, शेख राजू सर, नजीब सौदागर सर, शाकेरा मॅडम, मलिका मॅडम यांनी परिश्रम घेतले.



# सौर कृषिपंपाच्या बनावट कॉलला बळी पडू नका

## महावितरण विभागाचे आवाहन

पुणे : 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेला शेतकऱ्यांचा प्रतिसाद मिळाला असून महावितरणतर्फे सर्वांत आधी नोंदणी करणाऱ्यास प्राधान्य या क्रमाने सौर कृषिपंप बसविण्यात येत आहेत. प्रतीक्षा यादी बदलून पंप आधी बसवून देतो, असे आश्वासन देणारे काही बनावट कॉल शेतकऱ्यांना येत असल्याची तक्रार प्राप्त झाली आहे. शेतकऱ्यांनी अशा बनावट कॉल किंवा मेसेजला बळी पडू नये तसेच अशा कॉलनुसार कोणालाही पैसे देऊ नयेत, असे आवाहन महावितरणने केले आहे.



'मागेल त्याला सौर कृषीपंप' या योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन व पारदर्शक आहे. शेतकऱ्यांनी ज्या क्रमाने नोंदणी केली आहे त्यानुसार पंप बसविण्यात येत आहेत. कोणालाही प्रतीक्षा यादी बदलून व इतरांना डावलून पंप देण्यात येत नाहीत. शेतकऱ्यांनी नोंदणी करताना आपल्या हिश्श्याची रक्कम भरल्यानंतर पंप बसविण्यासाठी नंतर कधीही पैसे भरण्याची गरज नाही. शेतकऱ्याने आपल्या हिश्श्याची रक्कम भरून पंप बसविणाऱ्या एजन्सीची निवड केली की त्या शेतकऱ्याचे नाव प्रतीक्षा यादीत समाविष्ट होते. यादीनुसारच पंप बसविण्यात येत आहेत. या योजनेत प्रतीक्षा यादी डावलून आधी पंप बसवून देतो असे बनावट कॉल आले, तर शेतकऱ्यांनी त्याबाबत महावितरणच्या १८०० २३३ ३४३५ अथवा १८०० २१२ ३४३५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून तक्रार करावी. तसेच जवळच्या महावितरण कार्यालयातील अधिकाऱ्यांकडे संपर्क साधून शंका निरसन करता येईल.

या योजनेत शेतकऱ्यांना केवळ दहा टक्के रक्कम भरून सौर पॅनेल्स व सौर कृषीपंप असा संपूर्ण संच मिळतो. केंद्र सरकारकडून ३० टक्के, तर राज्य सरकारकडून ६० टक्के अनुदान मिळते. अनुसूचित जाती-जमातीच्या शेतकऱ्यांना केवळ पाच टक्के लाभार्थी हिस्सा भरावा लागतो. सौर पॅनेल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ पंपाचे बिल येत नाही. तसेच दिवसा वीज पुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांच्या सोईचे होते. राज्य सरकारने जाहीर केलेल्या या योजनेत शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात नोंदणी केली आहे. सौर कृषिपंप बसविण्याच्या बाबतीत सध्या महाराष्ट्र राज्य देशात पहिल्या क्रमांकावर आहे. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार लवकरात लवकर पंप बसविण्यासाठी महावितरण प्रयत्न करत आहे.

### साहित्याची मागणी चुकीची

शेतात सौर कृषिपंप बसविताना काही ठिकाणी संबंधित एजन्सीकडून शेतकऱ्यांकडे वाहतूक खर्च अथवा अन्य साहित्याची मागणी झाल्याच्याही तक्रारी महावितरणकडे आल्या आहेत. परंतु सौर कृषी पंप बसविण्याबाबत संपूर्ण कामाची जबाबदारी संबंधित एजन्सीची असल्याने शेतकऱ्यांनी अशा प्रकारे साहित्याची मागणी झाल्यास त्याची दखल घेऊ नये व महावितरणकडे तक्रार करावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# मदर डेअरीकडून दूध विक्री दरात प्रति लिटर २ रुपयांची वाढ

पुणे : मदर डेअरीकडून दुधाच्या विक्री दरात २ रुपयांची वाढ करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. परंतु खरेदी दर मात्र कायम ठेवण्यात आले आहेत. नवीन विक्री दर ३० एप्रिल २०२५ पासून लागू करण्यात आल्याचं मदर डेअरी प्रसिद्धी पत्रकात स्पष्ट केलं आहे. ही दरवाढ दिल्ली, उत्तर प्रदेश, हरियाणा आणि उत्तराखंड या राज्यांसाठी लागू करण्यात आली आहे.

दूध खरेदी दरात वाढ झाल्याचा दावा कंपनीने केला आहे. कंपनी दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, ''दूध खरेदी दरात वाढ झाली आहे. त्यामुळे दुधाच्या विक्री दरात वाढ करण्याचा निर्णय घ्यावा लागला. मागील काही महिन्यात दूध खरेदीचा खर्च प्रति लिटर ४ ते ५ रुपयांपर्यंत वाढला आहे.'' असंही मदर डेअरीनं सांगितलं आहे. मदर डेअरीकडून विक्री दरवाढीमुळे शेतकऱ्यांच्या खरेदी दरात मात्र वाढ करण्यात आलेली नाही. या निर्णयामुळे ग्राहकांना प्रति लिटर २ रुपये अधिकचे मोजावे लागणार आहे. परंतु त्या तुलनेत खरेदी दरात वाढ न केल्याने शेतकऱ्यांना त्याचा फायदा मिळणार नाही, असं जाणकार सांगतात. वाढत्या उष्णतेमुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांचा खर्च वाढला आहे. तसेच उत्पादनही घटलं आहे. त्यामुळे उत्पादन खर्च वसूल होत नाही, असं शेतकरी सांगतात. त्यामुळे या लीन सीझनमध्ये दूध खरेदीचे दर वाढण्याची अपेक्षा शेतकऱ्यांना होती. परंतु कंपन्यांकडून दूध विक्री दरात वाढ केली जात आहे. यापूर्वी मदर डेअरीकडून दुधाच्या खरेदी दरात वाढ करण्यात आली आहे. परंतु खरेदी दर मात्र जैसे थे ठेवण्यात आले आहेत.

महाराष्ट्रात सध्या वाढत्या उष्णतेमुळे दूध उत्पादनात घट झाली आहे. तसेच पशुखाद्याचे दरही वाढले आहेत. परंतु दूध खरेदीच्या दरात मात्र वाढ करण्यात आलेली नाही. मागील पाच ते सहा वर्षांपासून दूध उत्पादकांची आर्थिक कोंडी झालेली आहे. दरम्यान, उत्तम प्रतीचं दूध ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याची व शेतकऱ्यांचं जीवनमान टिकवण्याची आमची वचनबद्धता कायम असल्याचा दावा मदर डेअरीनं केला आहे.

तसेच ही दरवाढ म्हणजे वाढलेल्या खर्चाचा केवळ अंशतः परिणाम असून, शेतकरी आणि ग्राहक दोघांच्याही हिताची काळजी घेतली आहे, असंही कंपनी सांगितलं आहे.



# केळीच्या चांगल्या उत्पादनासाठी 'काळी बोंडी कूज' रोगाचे करा नियंत्रण

केळी पिकावरील जळका चिरूट ज्याला आपण काळी बोंडी कूज' म्हणून सुद्धा ओळखतो हा रोग तीन ते चार वर्षांपूर्वी कमी घातक रोग म्हणून ओळखला जायचा. परंतु काही काळापासून हा एक महत्त्वाचा रोग म्हणून उदयास येत आहे ज्याचे मुख्य कारण म्हणजे वातावरणातील अति आर्द्रता. सिगार एंड रॉट हा केळीच्या फळांचा प्रमुख रोग आहे. हा रोग प्रामुख्याने ट्रॅचिस्फेरा फ्रुक्टिजेना या बुरशीमुळे होते आणि काही वेळा व्हर्टिसिलियम थियोब्रोमामुळे देखील होते.

रोगाचा प्रसार : हा रोग वारा किंवा पावसामुळे पसरतो. पावसाळ्यात केळीच्या फुलांच्या अवस्थेत निरोगी उतींवर बुरशीचा हल्ला होतो. ते फुला द्वारे केळीला संक्रमित करते. तेथून पुढे ते फळांच्या टोकापर्यंत पसरते आणि कोरड्या कुजेला कारणीभूत ठरते जे राखेसारखे दिसते आणि सिगारसारखे दिसते, ज्यामुळे रोगाला सिगार एंड रॉट असे नाव दिले जाते. स्टोरेजमध्ये किंवा वाहतुकी दरम्यान या रोगाचा प्रसार संपूर्ण फळांवर होतो.रोगाची लक्षणे : हा रोग फळांच्या टोकांवर येत असून टोके कोरड्या, तपकिरी ते काळी कुजल्यासारखी दिसतात. बुरशीची वाढ प्रत्यक्षात फुलांच्या अवस्थेपासून सुरू होते आणि फळांच्या परिपक्वतापूर्वी किंवा त्यापूर्वी दिसून येते. प्रभावित भाग तपकिरी बुरशीच्या वाढीने झाकले जातात. जे स्कॅबच्या जळलेल्या टोकावर राखेसारखे दिसतात. फळांचा आकार असामान्य दिसतो, त्यांच्या पृष्ठभागावर साचा दिसून येतो आणि त्वचेवर जखम स्पष्टपणे दिसतात.



रोगाचे जैविक नियंत्रण : या रोगास कारणीभूत असलेल्या बुरशीच्या नियंत्रणासाठी बेकिंग सोडावर आधारित फवारणी केली जाऊ शकते. ही फवारणी करण्यासाठी, ५० ग्रॅम बेकिंग सोडा पाण्यात विरघळवून २५ मिली द्रव साबण प्रति लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार केले जाते. संसर्ग टाळण्यासाठी, हे मिश्रण संक्रमित फांद्या आणि जवळच्या फांद्यावर फवारावे. हे केळीच्या बोटांच्या पृष्ठभागाची पीएच पातळी वाढवते आणि बुरशीच्या वाढीस प्रतिबंध करते.रासायनिक नियंत्रण : शक्य असल्यास जैविक उपचारासह प्रतिबंधात्मक उपायांसह एकात्मिक दृष्टिकोनाचा नेहमी विचार करा. हा रोग सहसा किरकोळ महत्त्वाचा असतो आणि क्वचितच रासायनिक नियंत्रणाची आवश्यकता असते. मात्र गेल्या तीन वर्षात या आजाराच्या तीव्रतेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे कारण अतिवृष्टीमुळे वातावरणात भरपूर ओलावा निर्माण झाला आहे, जो या आजाराच्या प्रसारासाठी महत्त्वाचा आहे. त्यामुळे रासायनिक नियंत्रणासाठी केळीच्या बाधित घडावर एकदा मॅन्कोझेब, ट्रायओफेनेट मिथाइल किंवा मेटालॅक्सिल १ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी आणि नंतर प्लास्टिकने झाकून टाकावे. कॉपर ऑक्सिक्लोराईड स्प्रे सारखी कॉपर बुरशीनाशके देखील प्रभावी ठरू शकतात. परंतु फवारणीच्या १० दिवसांनंतरच फळांची काढणी करावी.

# खरीप पिकांतील 'पैसा किडीचे' एकात्मिक व्यवस्थापन

खरीप पिकांची लागवड झाल्यावर सर्वात मोठ्या प्रमाणात कोणत्या किडीचा प्रादुर्भाव होत असेल तर तो पैसा किडीचा. या किडीला वाणी किंवा तेलंगी अळी किंवा मिलीपीड अशा नावाने सुद्धा ओळखले जाते. ही कीड सोयाबीन, कापूस, तूर, मूग आणि उडीद पिकावर मोठ्या प्रमाणात येते. पैसा/वाणी म्हणजेच मिलीपीड या किडीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव दिसून येतो.

मिलीपीड ही एक निशाचर कीड असून सामान्यत: सडणारी पाने तसेच काडीकचरा, कुजणाऱ्या वनस्पती इत्यादी पदार्थांना खाऊन उपजीविका करते साधारणपणे निसर्गात यांची भूमिका कुजलेल्या काडी कचरा विघटन करण्यास मदत करणारा प्राणी अशी आहे. परंतु जेव्हा त्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढते तेव्हा ते जमिनीवर संपर्कात येणारे रोपटे, अंकुरलेले बियाण्यांना खाऊन नुकसान करतात, जमिनीलगत रोपे कुरतडून टाकतात. पैसा/वाणी किडींनी कुरतडल्यामुळे रोपांची संख्या कमी होऊन दुबार पेरणीची वेळ येऊ शकते. शेतकरी बांधवांनी जागरूक राहून वेळोवेळी पिकाचे निरीक्षण करून या किडीचे एकात्मिक व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

जीवनक्रम : मिलीपीड किडीच्या अंडी, अळी व प्रौढ या अवस्था आढळून येतात. अंडी जमिनीत काही इंच खोलीवर टाकली जातात. एक मादी साधारणपणे ३०० च्या जवळपास अंडी घालते. अळीच्या पाच अवस्था आढळून येतात. प्रौढ अवस्था ही प्रदीर्घ काळाची आहे. संपूर्ण जीवनक्रम



हा पाच ते सात वर्षात पूर्ण होतो. या किडीच्या वाढीसाठी जमिनीत आर्द्रता असणे आवश्यक आहे त्यामुळे पावसाळ्यात किंवा जिथे ओलिताची सोय आहे अशा ठिकाणी ही कीड जास्त सक्रिय असते. हवामान अनुकूल नसल्यास ही कीड जमिनीत सुप्त अवस्थेत राहते.एकात्मिक व्यवस्थापन : शेतातील पालापाचोळा किंवा वाळलेले कुजलेले काडी कचरा गोळा करून नष्ट करावा. वाणी रात्री सक्रिय असल्याने रात्रीच्या वेळी शेतात गवताचे ढीग करून ठेवावेत आणि सकाळी गवताच्या ढीगाखाली जमा झालेले वाणी जमा करून मिठाच्या किंवा साबणाच्या द्रावणात टाकावेत.

शेतातील आर्द्रता आणि लपण्याची ठिकाणे कमी करून बांधावरील गवत व दगड काढून बांध मोकळा ठेवावा. बऱ्याचदा आर्द्रता, घनदाट पिकात जास्त पाणी दिल्यामुळे किंवा संध्याकाळी पिकात पाणी चालू ठेवल्यास वाणीचा प्रादुर्भाव वाढतो. जास्त आर्द्रता व अन्नाचा पुरवठा नसल्यास काही दिवसातच वाणी मरतात. ज्या ठिकाणी शेतकऱ्यांनी पेरणीपूर्वी बियाण्याला बीजप्रक्रिया केली आहे तेथे वाणीचा प्रादुर्भाव कमी आढळून आलेला आहे. पिकामध्ये वेळेवर कोळपणी करावी त्यामुळे जमिनीतील अंडी व लपून बसलेल्या वाणी किडी उघड्या पडून नष्ट होतील. चांगला पाऊस पडल्यास या किडींचे नैसर्गिक नियंत्रण होते.

रासायनिक व्यवस्थापन : कीड संपूर्ण शेतात पसरली असल्यास क्लोरोपायरीफॉस १० टक्के दाणेदार किंवा फिप्रोनील ०.३% दाणेदार या यापैकी कोणत्या एका कीटकनाशकाची निवड करून ५ किलो प्रति हेक्टर १०० किलो शेण खतात मिसळून ओळीने शेतातील रोपाजवळ वापर करू शकता. (या कीटकनाशकाचा वापर करण्यापूर्वी स्थानिक तज्ज्ञांचा सल्ला घेऊन लेबल क्लेम शिफारसी प्रमाणेच व लेबल क्लेम शिफारस तपासूनच गरज असेल तरच वापर करावा). कार्बोफ्युरॉन (३ टक्के दाणेदार) किंवा फिप्रोनिल (०.६ टक्के) ४ किलो प्रति १०० किलो शेणखतात मिसळून ओळीने शेतातील रोपा जवळ वापरावे. आमिष सापळ्यांचा वापर करावा त्यामध्ये गहू पीठ दीड कप + मध दोन चमचे + कार्बोसल्फान ५० मिली + पाणी अर्धा कप प्रमाणात मिश्रण करावे. मिश्रणाच्या गोळ्या करून पोत्याच्या तुकड्यामध्ये बांधून जमिनीत १५ ते २० ठिकाणी ४ ते ६ इंच खोल गाडाव्यात. थायोडिकार्ब ७५% कीटकनाशक २५० ग्रॅम प्रति एकर अधिक २ ते ३ किलो धान्याचा कोंडा/ लाकडाचा भुसा/कोरडे शेणखत/लाह्या/ मुरमुरे यामध्ये मिसळून प्रादुर्भावग्रस्त प्लॉट मध्ये पसरून द्यावेत.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७७५ : पेरीस देशांत उघडणाऱ्या आणि बंद होणाऱ्या छत्रीचा शोध लावण्यात आला.
१७८० : अमेरिकन एकेडमी ऑफ आर्ट्स अँड सायन्सची स्थापना करण्यात आली.
१७९९ : श्रीरंगपट्टणमच्या लढाईत टिपू सुलतान ब्रिटिशांकडून मारला गेला.
१८५४ : भारतातील पहिले टपाल तिकीट प्रकाशित झाले.
१९०४ : अमेरिकेने पनामा कालव्याचे काम सुरू केले.
१९१० : रॉयल कॅनेडियन नेव्ही ची स्थापना.
१९३० : ब्रिटीश पोलिसांनी महात्मा गांधींना अटक करून येरवडा तुरुंगात ठेवले.
१९५९ : पहिले ग्रॅमी पुरस्कार आयोजीत केले गेले.
१९६७ : श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर नाशिक येथील मंदिरात जाऊन देवाची पूजा करण्याचा अधिकार सर्वांना आहे असा उच्च न्यायालयाचा निर्णय.
१९७९ : मार्गारेट थॅचर युनायटेड किंग्डमच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनल्या.
१९८९ : सर्व पंचायत समित्यांमधे महिलांसाठी ३० टक्के जागा राखीव ठेवल्या जातील, अशी पंतप्रधान राजीव गांधी यांनी घोषणा केली.
१९९२ : संगीतकार भूपेन हजारिका यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर
१९९५ : 'बॉम्बे' वजी 'मुंबई' हेच मूळ नाव अधिकृत राहील, असा शिवसेना-भाजप युती यांच्या राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय.
१९९५ : महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने 'बॉम्बे' चे 'मुंबई' असे नामकरण करण्याचा निर्णय घेतला.
१९९६ : जागतिक वेटलिफ्टिंग स्पर्धेत भारताला सहा पदके, एन. कुंजुरानीदेवीला दोन रौप्यपदके

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१००६ : पर्शियन सुफि संत अबू इस्माल अब्दुल्लाह अल-हेरावी अल-अंसारी उर्फ अब्दुल्ला अन्सारी यांचा जन्मदिन.
१००८ : ख्वाजा अब्दूल्ला अन्सारी पर्शियन सूफी संत (मृत्यू: १०८८)
१००८ : हेन्री (पहिला) फ्रान्सचा राजा (मृत्यू: ४ ऑगस्ट १०६०)
१६४९ : छत्रसाल बुंदेला बुंदेलखंडचा महाराजा (मृत्यू: २० डिसेंबर १७३१)
१६५५ : पियानोचे निर्मिते बार्टोलोमीओ क्रिस्टोफोरी यांचा जन्म. (मृत्यू: २७ जानेवारी १७३१)
१७६७ : त्यागराज दाक्षिणात्य संगीतकार (मृत्यू: ६ जानेवारी १८४७)
१९०२ : भारतातील कर्नाटक राज्याचे पहिले मुख्यमंत्री क्यासमांबल्ली चेंगलुराया रेड्डी यांचा जन्मदिन.
१८२५ : थॉमस हक्सले ब्रिटिश जीवशास्त्रज्ञ, विज्ञानकथालेखक आणि डार्विनच्या उत्क्रांतिवादाचा खरा समर्थक (मृत्यू: २९ जून १८९५ इस्ट्बोर्न, इंग्लंड)
१८४७ : महर्षी विनायक रामचंद्र उर्फ अण्णासाहेब पटवर्धन धार्मिक आणि राष्ट्रीय मनोवृत्तीचे पुण्यातील एक नामांकित धन्वंतरी व लोकमान्य टिळकांचे स्नेही (मृत्यू: २ फेब्रुवारी १९१७)
१८४९ : ज्योतिरिंद्रनाथ टागोर थोर बंगाली साहित्यिक, नाटककार, संगीतकार, चित्रकार व संपादक, रविंद्रनाथ टागोर यांचे वडील बंधू, त्यांनी लोकमान्य टिळकांच्या गीतारहस्याचे बंगालीत भाषांतर केले (मृत्यू: ४ मार्च १९२५ रांची, झारखंड)
१९२८ : होस्नी मुबारक इजिप्तचे चौथे राष्ट्राध्यक्ष
१९२९ : ऑड्रे हेपबर्न ब्रिटिश अभिनेत्री, संयुक्त राष्ट्रांच्या बालक निधीच्या सदिच्छा प्रतिनिधी, 'रोमन हॉलिडे' या चित्रपटातील अभिनयाबद्दल त्यांना ऑस्कर पुरस्कार मिळाला. (मृत्यू: २० जानेवारी१९९३)
१९२९ : वीरसेन आनंदराव तथा 'बाबा' कदम गुप्तहेरकथालेखक (मृत्यू: २० आक्टोबर २००९)
१९३३ : प्रख्यात मराठी कादंबरीकार बाबा कदम यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑक्टोबर २००९)
११३४ : महात्मा बसवेश्वर.
१९३४ : अरुण दाते भावगीत गायक
१९४० : रॉबिन कूक इंग्लिश कादंबरीकार
१९४२ : सत्यनारायण गंगाराम तथा सॅम पित्रोडा भारतातील दूरसंचारसेवांचा विस्तार करण्यास कारणीभूत असलेले शास्त्रज्ञ, पंतप्रधानांचे विज्ञान व तंत्रज्ञानविषयक सल्लागार
१९४३ : भारतीय अर्थशास्त्रज्ञ प्रसांत पटनाईक याचा जन्म.
१९४५ : भारतीय पत्रकार आणि कस्तुरी कुटुंबाचे सदस्य तसचं, 'द हिंदू' समुहाचे माजी व्यवस्थापकीय संचालक व माजी मुख्य संपादक एन. राम यांचा जन्मदिन.
१९८४ : मंजुरूल इस्लाम बांगला देशचा क्रिकेटपटू (मृत्यू: १६ मार्च २००७)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९९ : टिपू सुलतान, म्हैसुरचा वाघ म्हणून ओळखला जाणारा पराक्रमी श्रीरंगपट्टणम येथे इंग्रजांशी लढताना मारला गेला.
१७९९ : हैदरअलीचा थोरला मुलगा व मैसूरचा वाघ, शहाबहादूर फतेह अली खान ऊर्फ टिपू सुलतान इंग्रजांबरोबर झालेल्या लढाईत ठार झाला. (जन्म: २० नोव्हेंबर १७५०)
१९०५ : स्वातंत्र्य भारतातील पहिला महिला न्यायाधीश तसचं, उच्च न्यायालयाच्या पहिल्या भारतीय महिला न्यायाधीश आणि स्वातंत्र्यपूर्व भारतातील एमिली मर्फी यांच्यानंतर न्यायाधीश पदी विराजमान होणाऱ्या पहिल्या महिला अण्णा चंडी यांचा जन्मदिन.
१९६८ : बंगाली साहित्यिक आशुतोष मुखोपाध्याय यांचे निधन.
१९८० : अनंत काणेकर चतुरस्त्र साहित्यिक, कवी व पत्रकार, 'पद्मश्री' व 'सोविएत लँड नेहरू पुरस्कार' विजेते. मुंबईतील 'नाट्यमन्वंतर' या प्रयोगशील नाट्यसंस्थेचे ते एक संस्थापक होते. (जन्म: २ डिसेंबर १९०५)
१९८० : जोसेफ टिटो क्रांतिकारक आणि युगोस्लाव्हियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: ७ मे १८९२)
१९३८ : ज्युदोचे संस्थापक कानो जिगोरो यांचे निधन. (जन्म: २८ ऑक्टोबर १८६०)
२००८ : किशन महाराज तबलावादक (जन्म: ३ सप्टेंबर १९२३)

# बीड जिल्ह्यात ११५ दिवसात ९० शेतकऱ्यांच्या आत्महत्या

## अद्याप एकाही आत्महत्याग्रस्त कुटुंबियांच्या वारसांना शासकीय मदत नाही

बीड। प्रतिनिधी

अतिवृष्टीमुळे ,नापिकी कर्ज आधी विविध कारणामुळे बीड जिल्ह्यात अनेक वर्षांपासून शेतकरी आत्महत्यांच्या घटना सातत्याने घडत आहेत.शेतीचा वाढलेला खर्च,नापिकी, कर्जबाजारीपणा, तसेच अतिवृष्टीमुळे होणारे शेतीपिकांचे नुकसान आदि कारणामुळे शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहेत.या आत्महत्या रोखण्यासाठी शासन स्तरावरून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत.तरीही शेतकरी आत्महत्यांच्या घटना थांबलेल्या नाहीत. सन २०२५ या नविन वर्षात१ जानेवारी ते २५ एप्रिल २०२५ या दरम्यान ११५ दिवसात जिल्ह्यातील ९० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची शासन दरबारी नोंद आहे .मात्र यातील एकही आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांच्या वारसांना शासकीय मदत मिळालेली नाही. राज्याचे उपमुख्यमंत्री वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजित दादा पवार यांच्या जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या नंतर शासकीय योजनांची व्यवस्थित अंमलबजावणी न केल्याने

त्यांच्या कुटुंबीयांची आणखी परवडत होत असून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला सरकारकडून मिळणारे एक लाख रुपये मदत वेळेवर दिली जात नाही. बीड जिल्ह्यात गेल्या ०४ महिन्यात ९९ शेतकरी आत्महत्या झालेल्या आहेत. यातील ५८ प्रकरणे अद्यापही चौकशीसाठी प्रलंबित आहेत तर चौकशीनंतर २७ प्रकरणे मदतीसाठी पात्र ठरलेली आहेत परंतु अद्याप त्यांना सरकारची मदत मिळाली नाही. त्यामुळे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या साठी हि लाजिरवाणी बाब असुन तातडीने मदत देण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.५ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार आहेत.शेतकरी आत्महत्या प्रकरणातील मदत वेळेत संबंधित आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना मिळाली पाहिजे. तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय यंत्रणेकडून आवश्यक अहवाल घेऊन चौकशी प्रलंबित प्रकरणे प्राधान्याने १ महिन्याच्या आत मार्गा लावावीत अशा सूचना मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी विभागीय आयुक्तांना सुचना देत शेतकरी आत्महत्या मदतीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे आढावा जाहीर केले आहे.मात्र प्रशासन स्तरावरील यंत्रणा ढिसाळ असल्याने याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे आदेश पायदळी तुडवल्याचे दिसून येत आहे.



**शेतकरी आत्महत्या सन २०२५**

| | |
|---|---|
| जानेवारी | १९ |
| फेब्रुवारी | २५ |
| एप्रिल. | (ता.२५ पर्यंत ) १९ |
| एकुण | ९० |
| मदतीस पात्र प्रकरणे | २७ |
| अपात्र प्रकरणे | ०५ |
| चौकशीसाठी प्रलंबित प्रकरणे | ५८ |
| मदत दिलेली प्रकरणे | ० |

## पोखरीकरांनी बांधली लोकवर्गणीतून शाळा; खा.सोनवणेंकडूनही पाच लाखाची देणगी

बीड : जिल्हा परिषदेत शिक्षण सभापती असताना शक्य होईल तसे ग्रामीण भागातील शाळांसाठी निधी दिला. पण पोखरीकरांनी शासनाच्या पैशाची वाट न पाहता उज्वल भविष्यासाठी शाळेसाठी लोकवर्गणी केली आणि ४० लाख रूपये खर्च करून इमारत पुर्ण केली ही कौतूकास्पद आणि अभिमानास्पद गोष्ट आहे. या शाळेसाठी भविष्यात शासकिय निधी तर मिळवून देईलच परंतु येडेश्वरी फाऊंडेशनच्या माध्यमातूनही पाच लाख रूपर्य देणगी देत आहे, अशी घोषणा खा.बजरंग सोनवणे यांनी केली.

पोखरी घाट (ता.बीड) येथे सन २०१८ मध्ये ग्रामस्थांनी इयत्ता आठवीपर्यंत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा इमारतीसाठी लोकवर्गणी केली. लोकवर्गणीतून टोलेजंग अशी शाळा इमारत उभा केली असून या इमारतीसाठी दोन एकर जमीनही ग्रामस्थांनी विनंती केल्यानूसार ग्रामस्थांनी दिली. दि.२ मे रोजी जगद्गुरू श्री.संत तुकाराम महाराज मंदिर वर्धापन दिनानिमीत्त त्रिदिनी कीर्तन महोत्सव आणि जंगी निकाली कुस्त्यांचा कार्यक्रम आयोजीत केला होता. शिवाय याचवेळी लोकसहभागातून साकारलेली जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा इमारतीचा लोकार्पण सोहळा आयोजी केला होता. या कार्यक्रमात खा.बजरंग सोनवणे बोलत होते. यावेळी व्यासपिठावर मठाधिपती ह.भ.प लक्ष्मण महाराज मेंगडे, ह.भ.प तुकाराम महाराज भारती, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, ह.भ.प मारोती महाराज चोरमले, नाना महाराज कदम, सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, हनुमान मुळीक, राहूल वायकर, ज्ञानदेव काशीद, विकी वानी, राम फाळके यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, पोखरी घाट हे गाव छोटे आहे पण येथील लोक मोठ्या मनाचे आहेत. त्यांनी मला मोठ्या मनाने लोकसभेत सहकार्य केलेच पण शासनाच्या पैशाची वाट न पाहता आपल्या लेकरांच्या उज्वल भविष्यासाठी ४० लाख रूपये खर्च करून शाळा बांधली. हा आदर्श महाराष्ट्र घेईल. हे गाव ऊसतोड मजुरांचे आहे. कष्टकरी, शेतकरी यांनी राजकिय जोडे बाजूला ठेवून दाखविलेली एकजूट ही कौतूकास्पद आणि अभिमानास्पदही आहे. एक गुंठा कोणी कोणाला देऊ शकत नाही, अशा काळात येथील शेतकऱ्यांनी दोन एकर शाळेसाठी दान करणे हे दातृत्व मोठे आहे. या ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून शाळा बांधून नवा आदर्श निर्माण केला आहे. अशा ठिकाणी मी खासदार म्हणून शाळेच्या विकास कामासाठी शासकिय योजनातून मदत करेलच परंतु येडेश्वरी फाऊंडेशनच्या माध्यमातून पाच लाख रूपयाची देणगी देणार आहेत. या देणगीतून ग्रामस्थांनी आवश्यकतेनूसार खर्च करावा, असेही ते म्हणाले.

## आंबेडकरी अनुयायांनी बुद्ध धम्माची चळवळ गतिमान करण्यासाठी पुढाकार घ्यावा:पप्पु कागदे

बीड। प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील प्रचलित धर्माचा अभ्यास केला होता. त्या धर्मामध्ये बौद्ध धम्माने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना प्रभावित केले होते. बुद्ध धम्मात जाती-भेद-उच्च-निच अस्पृश्यतेला थारा नव्हता. या धम्मात सर्व मानव समान आहेत. म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ साली धर्मांतराची घोषणा केली होती. मी हिंदू म्हणून जरी जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही. अशी घोषणा करुन १४ आक्टोबर १९५६ साली नागपुरात बुद्ध धम्माची दिक्षा घेऊन तथागताच्या बुद्ध धम्माचा स्वीकार केला. तथागताच्या बुद्ध धम्माचा प्रसार व प्रचार करण्यासाठी आंबेडकरी अनुयायांनी पुढाकार घ्यावा. असे आवाहन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती प्रसंगी मांजरसुंबा, जरूड, आंबे सावळी, म्हाळसापूर, जवळा, आहेर चिंचोली येथे केले.

पुढे बोलतांना कागदे म्हणाले की, धर्म हा केवळ कायदा किंवा आज्ञा नसाव्यात. ज्या क्षणी धर्माचे रूपांतर कायद्यात होते, त्या क्षणाला तो धर्म भष्टू होतो. खऱ्या अर्थाने धर्म धार्मिक संकल्पनेचा गुणच मारुन टाकतो. जीवन व वास्तव यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोण आणि विचारात बदल करणे म्हणजेच धर्मांतर ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका होती. म्हणूनच दया, क्षमा, शांती व करुणेचा संदेश देणाऱ्या तथागत भगवान गौतम बुद्धाच्या धम्माची नागपूर मुक्कामी लाखो अनुयायांना सोबत घेऊन दिक्षा घेऊन सारा भारत बुद्धमय करण्याचा संकल्प केला होता. आगामी काळात बुद्ध धम्माचा प्रसार करून धम्म चक्र गतिमान करण्यासाठी आंबेडकरी अनुयायांनी पुढाकार घ्यावा.यावेळी राजू जोगदंड, किसन तांगडे, सुभाष तांगडे, शाम वीर, विशाल इंगोले, संदिप इंगोले विकास कोरडे, गौतम कोरडे, प्रमोद वाघमारे, बाळासाहेब गव्हाणे,बिभीषण जावळे,रामेश्वर खळगे, भाऊसाहेब कांबळे, देवानंद वाघमारे, अविनाश वाघमारे, नामदेव वाघमारे, महादेव ईनकर, अनंत विद्यागर यांच्यासह शेकडो अनुयायी उपस्थित होते.



## पालखी मार्गातील मळेकरवाडी घाटाचे काम अखेर सुरू

### पैठण-पंढरपूर महामार्गासाठी खा.बजरंग सोनवणे यांचा पाठपुरावा फळाला

बीड। प्रतिनिधी

पैठण-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गातील डोंगरकिन्ही ते चुंबळीमधील मळेकरवाडी घाटातील रस्त्याचा प्रश्न गेल्या दहा बारा वर्षांपासून प्रलंबित आहे. हा प्रश्न सुटावा यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी निवडणूकीचा निकाल लागताच पहिल्या बैठकीत हा प्रश्न निकाली काढण्यासाठी चर्चा केली होती. शिवाय मुंबईत संबधित विभागात बैठक घेतली होती. यानंतर आता अखेर घाटाचे काम सुरू झाले आहे.

पैठण-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील पाटोदा तालुक्यामधे डोंगरकिन्ही ते चुंभळीमधील मळेकरवाडी घाटातील रस्त्याचा प्रश्न गेल्या १०-१२ वर्षांपासून प्रलंबित होता. घाटातील हा रस्ता वन्यजीव विभागाच्या भूमिकेमुळे बंद पडला होता. त्यामुळे डोंगरकिन्ही ते पाटोदा वाहतुक पूर्णपणे बंद पडली होती. अनेकदा या घाटात अपघातही घडले होते. खा.बजरंग सोनवणे यांनी निवडणूकीचा निकाल लागल्यानंतर तातडीने दि.१८ जून २४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयामधे झालेल्या राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या बैठकीमधे हा रस्ता चालू करण्यासाठी आवश्यक सूचना देण्यात आल्या होत्या. याचबरोबर मुंबई येथे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे विभागीय अधिकारी प्रशांत फेगडे यांचे कार्यालयामधे झालेल्या बैठकीमधे पावसाळ्यापूर्वी या लांबीमधे डांबरीकरण करुन रस्ता वाहतुक सुरळीत करुन देण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार दि.३ मे रोजी डांबरीकरणाच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात झालेली आहे. लोकसभा निवडणूकीचा निकाल लागल्यानंतर हारतूरे सत्कार घेत न बसता खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती. या बैठकीत प्रलंबित कामे तातडीने मार्गा लावावेत, काही अडचणी असतील तर त्या सोडविण्यासाठी आपण प्रयत्न करू, निधीसाठी संबधित मंत्र्यांना भेटू, असेही म्हटले होते. यानंतर केवळ आश्वासन न देता त्यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अनेकादा भेटी देखील घेतल्या. शिवाय मुंबई येथे राष्ट्रीय महामार्ग कार्यालयात बैठक घेवून पावसाळ्यापुर्वी मळेकरवाडी रस्त्याचे काम करण्याच्या सुचना दिल्या होत्या. यानूसार आता कामकाज सुरू झाले असून जिल्ह्यातील नागरिकांनी याबद्दल खा.बजरंग सोनवणे यांचे आभार मानले आहेत.




## तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा



बीड। प्रतिनिधी

येथील देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम, महात्मा गांधी आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांच्या प्रतिमांचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. त्यानंतर, सकाळी ७:३० वाजता शाळेच्या प्राचार्या सौ.उमा जगतकर मॅडम यांच्या हस्ते ध्वजारोहण करून राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीताने मानवंदना देण्यात आली. या उत्सवी कार्यक्रमात शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

## भाषेच्या गौरवासाठी नवा अध्याय!

### मनोरंजन:अभिजात मराठी ओटीटी प्लॅटफॉर्मची घोषणा

बीड। प्रतिनिधी

महायुती सरकारच्या अथक प्रयत्नांना यश मिळाल्यामुळे मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा' दर्जा प्राप्त झाला. या गौरवाच्या प्रेरणेतून,१ मे २०२५ रोजी मुंबईतील रविंद्र नाट्य मंदिर, मिनी थिएटर येथे 'राजभाषा मराठी दिन विशेष कार्यक्रम' पार पडला.या कार्यक्रमात मंत्री डॉ. उदय सामंत, मराठी भाषा विभागाचे सचिव आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत'अभिजात मराठी' या नव्या ओटीटी प्लॅटफॉर्मचा लोगो आणि घोषणा करण्यात आली.त्यामुळे मराठी मनोरंजनाला एक नवे दालन खुले झाले आहे.

एआय आणि ग्लोबल कंटेंटच्या युगातही मायबोली अभिमानाने उभी राहावी,यासाठी सुमन एंटरटेनमेंटने 'अभिजात मराठी' या ओटीटी प्लॅटफॉर्मचा संकल्प केला आहे. सध्या अनेक मराठी कलाकृतींना प्रमुख ओटीटी प्लॅटफॉर्मवर कमी प्राधान्य दिलं जातं. 'अभिजात मराठी' हे त्यावर एक सशक्त आणि हक्काचं उत्तर ठरणार आहे.जगभरातील सुमारे २० कोटी मराठी भाषिक प्रेक्षकांना एकत्र जोडण्यासाठी 'अभिजात मराठी' हे व्यासपीठ उभं राहत आहे. ही केवळ एक ओटीटी सेवा नाही, तर भाषेचा सन्मान आणि मराठी निर्मात्यांसाठी नवा श्वास ठरणार आहे.

यावेळी मंत्री डॉ. उदय सामंत, आपल्या भाषणात म्हणाले ,''मराठी ओटीटी प्लॅटफॉर्म ही आता काळाची आणि भाषेची गरज बनली आहे.मराठी भाषेचं सामर्थ्य, तिचं जतन, प्रचार आणि प्रसार हेच आमचं ब्रीदवाक्य आहे.असे मत उदय सामंत यांनी व्यक्त केले.'अभिजात मराठी' चे संस्थापक केदार जोशी ह्यांनी सांगितले '''अभिजात मराठी' केवळ एक ओटीटी प्लॅटफॉर्म नाही, ती आपल्या भाषेची, आपल्या अस्मितेची, आणि आपल्या संस्कृतीची डिजिटल चळवळ असून'अभिजात मराठी' ओटीटीचा सॉफ्ट लॉन्च जुलै २०२५ मध्ये होणार आहे.

## भगवान परमात्मा हाही साधू संतांचा छंद जोपासतो-करंजवण

बीड। प्रतिनिधी

या जगतात साधुसंत हे अखंड त्या भगवंताच्या नामाचा छंद जोपासतात. त्यांच्या ठिकाणी कृष्णाबद्दल खरे प्रेम शुद्ध भाव भक्ती ही साधना आहे गोपळांनी देवाला यथार्थ ओळखले होते म्हणून ते देवावर नितांत प्रेम करत होते व देवही त्यांच्या प्रेमामुळे भक्ती मुळे त्यांच्या छंदात गुरु पटला जातो म्हणूनच भगवान परमात्मा हा साधुसंताचा छंद जोपासतो असे प्रतिपादन पांडुरंग महाराज यांनी संत वामन भाऊ ,भगवान बाबा प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ नगर येथे काला किर्तन प्रसंगी केले.

बीड येथील श्री संत वामन भाऊ महाराज व श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान येथे वामन भाऊ महाराज, भगवान बाबा महाराज, संत तुकाराम महाराज, विठ्ठल रुक्मिणी व हनुमंत देवता यांच्या तेराव्या प्राणप्रतिष्ठापना निमित्ताने संत वामनभाऊ महाराज व भगवान बाबा यांच्या कृपा आशीर्वादाने प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री हरिभक्ति परायण राजेंद्र सानप व बंधू यांच्या आयोजनातून संपन्न झालेल्या अखंड त्रिदिवशीय हरिनाम सप्ताहात काल्याच्या कीर्तनात गौळियाची ताकपिरे/कोण पोरे चांगली या संत तुकाराम महाराजांच्या चार चरणी अभंगातून हरिभक्ति परायण पांडुरंगमहाराज हे भगवंताला भक्ताचा किती छंद आहे हे सांगतात.



आपल्या अभंग निरूपणातून बोलताना हभप पांडुरंग महाराज गुरू रामदास महाराज म्हणाले की ,मृत्युलोकात तीन वर्ग आहेत. जड, चेतन व जडचेतनयुक्त म्हणजे जीव असे. हालचाल नाही, परिवर्तन नाही ते जड. त्यांच्या ठिकाणी कोणताच छंद नाही. जो विश्वाला चेतन देतो तो चेतन आहे. जो की ज्याला रंग ,रूप ,वर्ण व गुण नाही. या चेतनासही कोणताच छंद नाही. अंत:करण विशिष्ट चैतन्य तो जीव ,माया विशिष्ट चैतन्य तो ईश्वर.मायेच्या आधीन तो जीव व माया ज्याच्या आधीन तो ईश्वर किंवा संत होत. अंतकरण वृत्ती विश्वातील विषयाला अनुकूल किंवा प्रतिकूलतेत ग्रहण करते. प्रतिकूल तेथे मन परत फिरते व अनुकूल तेथे मन बाजूला निघत नाही. त्या मनाला देवाचा छंद लागल्यास परत माघारी घेत नाही. ल्यावे, खावे, प्यावे, असावे कल्याण हा संसारिकाचा छंद असतो .संसारात जे मूड आहेत त्यांना लावण्याचा छंद असतो. संतांना भगवंताच्या नावाशिवाय काहीच छंद नसतो .तसाच देवालाही संतांचा छंद असतो व त्या छंदातून भक्तांचा अंगीकार करतो. गोपाळांचे प्रेम पाहून तो बरा की वाईट हे न पाहता त्यांच्या तोंडातले ताक पिला. अव्यक्त असलेला देव भक्ताच्या प्रेमाकरिता आकाराला आला .भक्ताच्या प्रेमाला पाहून तो भक्त कोणत्या रूपाचा, कोणत्या जातीचा, कोणत्या राहणीमाणाचा असे काहीच पाहत नाही .एवढा छंद त्या भक्तांचा देवाला लागलेला असतो व व त्यातून तो त्या भक्ताचे योगक्षेम सर्वकाही चालवतो. असेही ते यावेळी म्हणाले.

याप्रसंगी हरिभक्ति परायण मोहन महाराज खरमाटे, श्रीभीमाशंकर महाराज तट , श्री अरुण नाना डाके,सुशिला ताई मोराळे, श्री नितीन धांडे शिवसेना नेते, श्री नारायण नागरे नाना,श्री रामहरी रसाळ गुरुजी, अनंत घीगे साहेब, प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री राजेंद्र सानप, नागरगोजे गुरुजी, , सुमित्रा ताई खेडकर, धनंजय सानप. गायक म्हणून, ह भ प अंगद महाराज मोरे, वैजनाथ सानप गुरुजी, दिगंबर कुंडलकर महाराज, अरुण बावणे महाराज, किसन माने महाराज, श्रीहर्ष महाराज धांडे, वैभव महाराज येडे तर मृदंगमणी म्हणून अक्षय महाराज घोलप व वैभव ढाकणे तर असंख्य भावी भक्त उपस्थित होते.

## पोखरी ( घाट) गावात कुस्त्यांच्या दंगलीने कुस्तीप्रेमींची मने जिंकली



लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पोखरी ( घाट) गावात दि.०२. शुक्रवार रोजी निकाली कुस्त्यांची दंगल लोकसहभागातून बांधण्यात आलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणातील मैदानात कुस्त्यांची दंगल पार पडली. बीडचे खा.बजरंग बप्पा सोनावणे, बीड जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार गट राजेंद्र मस्के, बंकटस्वामी मठाधिपती ह.भ.प. लक्ष्मण मेंगडे महाराज,बेलेश्वर संस्थान मठाधिपती शांती ब्रम्ह तुकाराम महाराज,चोरमले महाराज यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून कुस्ती दंगलीस प्रारंभ झाला.प्रारंभी लहान मुलांच्या व कुस्तीपटुंच्या कुस्त्या झाल्या.मात्र त्यानंतर पुणे,कोल्हापूर,अकलुज,अहिल्यानगर, धाराशिव, छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याच्या विविध भागातील कुस्तीपटुंच्या आखाड्यात कुस्त्या झाल्या.

१००० रूपये पासुन ३१,००० रूपयापर्यंत बक्षिसांची रक्कम ठेवण्यात आली होती. अंतिम लढत गणेश काळे मौलाली तालिम संघ भुम आणि कृष्णा पवार यांच्यात होऊन गणेश काळे विजयी झाले. त्यांचा स्मृती चिन्ह आणि ३१,००० रूपये रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला.द्वितीय बक्षीस २५,००० रूपये बाळु बहिरवाल पाटोदा तालीम आणि तृतीय बक्षीस २१,००० रूपये मयुर कणसे आष्टी आणि संदिप लटके जामखेड या कुस्तीपटुंना विभागुन देण्यात आले. यावेळी पंचकमेटी म्हणून बाळासाहेब लेणे पुणे, गहिनीनाथ सिरसाट अहिल्यानगर, बाळासाहेब आवारे पाटोदा, दादासाहेब खिल्लारे आणि पोखरी (घाट) सरपंच बिभीषण मुळीक यांची उपस्थिती होती.कुस्ती बघण्यासाठी लिंबागणेश पंचक्रोशीतील कुस्तीप्रेमींनी तसेच लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. यावेळी महिलांची सुद्धा मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

दादासाहेब खिल्लारे यांनी कुस्त्यांच्या दंगलीसाठी केलेले चोख नियोजन, परंडा येथील लक्ष्मण जाधव यांच्या हलगीच्या तालावर पाहुण्यांचे फेटा बांधून स्वागत,कुस्तीपटुंची ओळख, कुस्तीचे मोसीन अत्तार बार्शी यांची धावती कॉमेंट्री,कुस्तीपटुंना आखाडा जाम होऊन दुखापत होऊ नये यासाठी अधुनमधून रोटर फिरवून कुस्तीचे मैदान भुसभुशीत करणे आदी गोष्टी नजरेत भरणा-या होत्या याचा प्रेक्षकांनी मनमुराद आनंद घेतला. लोकसहभागातून बांधण्यात आलेल्या शाळेप्रमाणेच ग्रामीण भागातील युवावर्ग व्यसनमुक्त होऊन मैदानी खेळाकडे वळावा, ग्रामीण भागातील कुस्तीपटुंना प्रोत्साहन मिळावे यासाठी दरवर्षी कुस्त्यांच्या दंगलीचे आयोजन करण्यात येणार असुन उत्तरोत्तर भव्यदिव्य स्वरूपात कुस्त्यांच्या दंगली भरवण्यात येणार असल्याचे आयोजक दादासाहेब खिल्लारे यांनी सांगितले.

# मंगरूळ परिसरामध्ये बिबट्याचा मुक्काम; अनेक श्वानांचा पाडला फडशा

## नागरीकांमध्ये भितीचे वातावरण मंगरूळ परिसरातील वस्त्यांमध्ये देखील भीतीचे वातावरण

आष्टी । प्रतिनिधी

मंगरूळ परिसरातील मोठ्या प्रमाणावर बागायती क्षेत्र असल्याने ऊसाची लागवड आहे.पिकाचा आधार घेत बिबट्या दडण धरुन या तीन दिवसापासून मुक्काम ठोकला असून अनेक श्वानाचा फाडशा पाडला आहे.वनविभागाने याची दखल घेत घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता,बिबट्याचे ठसे व शेतात बिबट्याचे केस वनविभागाला आढळून आले आहेत.बिबट प्राणी असल्याचा दावा वनविभागाने केला आहे.यामुळे नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

आष्टी तालुक्यातील मंगरूळ परिसरात बागायती क्षेत्र असल्याने येथील शेतकरी उसाची लागवड मोठ्या प्रमाणावर केली आहे.या उसाच्या पिकाचा आधार घेऊन बिबट्याने सुरेश दिंडे यांच्या शेतात मुक्काम ठोकला या ठिकाणी बिबट्याचे वनविभागाला ठसे व केस देखील आढळून आले आहेत बिबट्याने परिसरातील





### वनविभाग घटनास्थळी; बिबट्याचे ठसे असल्याचे निष्पन्न,बिबट्या असल्याचा वनविभागाचा दावा

अनेक श्वानाचा फाडशा पाडल्याचे देखील शेतकऱ्यांनी सांगितले आहे.शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.श्वानाची शिकार करताना एखाद्या बळी जाऊ नये यासाठी वनविभागाने तात्काळ उपाययोजना करावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.घटनेची माहिती कळताच वन परिक्षेत्र अधिकारी संजय ढगे यांच्या आदेशावरून वनरक्षक अशोक काळे,वनरक्षक बाबासाहेब शिंदे, वनरक्षक किरण पंदलवाड, वन कर्मचारी युनूस शेख, मोरे,वनपाल जायभाय आदींनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली आहे

### नागरीकांनी घाबरून न जाता काळजी घ्यावी

बिबट्या चा वावर असलेल्या परिसरात ट्रॅप कॅमेरा लावण्यात येणार असून वनविभाग लक्ष ठेवून आहे.नागरीकांनी घाबरून न जाता बाहेर पडताना काळजी घ्यावी व लहान मुलांना एकटे सोडु नये वनविभाग दक्ष आहे.

**– संजय ढगे ( वनपरिक्षेत्र अधिकारी,आष्टी)**

# एमआयडीसीतील सर्व अडचणी सोडवणार -आ. सोळंके

## माजलगाव एमआयडीसीतील प्रश्नसंदर्भात उद्योजकांसमवेत आ. प्रकाश सोळंके यांची बैठक

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील एमआयडीसी मध्ये उद्योग, धंदे उभारण्यासाठी येत असलेल्या अडचणी संदर्भात उद्योजक आणि आमदार प्रकाश सोळंके यांची नुकतीच बैठक पार पडली असून एमआयडीसीतील सर्व अडचणी सोडवण्यासाठी आपण लवकरच उद्योग मंत्र्यांची भेट घेणार असल्याचे आश्वासन आमदार सोळंके यांनी उद्योजकांना दिले.

आमदार सोळंके यांच्या निवासस्थानी औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योग करताना येणाऱ्या समस्या संदर्भात मीटिंग विथ ब्रेकफास्ट




पार पडली. यावेळी उद्योजकांनी आमदार सोळंके यांच्यासमोर अडचणींचा पाढा वाचला असता मराठवाड्यातील अग्रगण्य औद्योगिक वसाहत म्हणून माजलगाव वसाहतीला नवी ओळख मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार तसेच एमआयडीसीतील पाणीपुरवठा, रस्ते व इतर सुविधा पूर्ण करण्यात आल्या आहेत. विजेसाठी लवकरच ३३ केव्ही उपकेंद्र उभारण्यात येईल. उद्योग उभारणीत असलेल्या अनेक अडचणींचा ही निपटारा लवकरच करण्यात येईल यासाठी आपण राज्याचे उद्योग मंत्री यांची भेट लवकरच घेणार असल्याचे आश्वासन आमदार सोळंके यांनी दिले. ही मीटिंग होण्यासाठी भगवानराव शेजुळ यांनी प्रयत्न केले. बैठकीस युवा उद्योजक वीरेंद्र दादा सोळंके, दिनकर शिंदे, व्यापारी महासंघाचे तालुका अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, गोविंद बजाज, राहुल जगताप, प्रणित होके पाटील, लक्ष्मीनारायण मुंदडा, प्रेम तापडिया, श्री. मुळे, अश्विन राठोड, जलाल पठाण अनेक युवा उद्योजकांची उपस्थिती होती.

# महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीसमुळे जात निहाय जनगणना झाली नाही -वसंत मुंडे

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

भारताचे कॉँग्रेस पक्षाचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात सन २०१४ च्या पूर्वी देशामध्ये जातनिहाय जनगणना सर्व निकषाचे पालन करून करण्यात आली. जातीवादी बीजेपीच्या नेत्यांनी ज्या त्या राज्यातील भाजपा सरकारला आर एस एस चा विचारधाराच्या वरिष्ठ नेत्यांनी जातीनिहाय जनगणनेच्या मुद्देनिहाय डाटा देण्यासंदर्भात वेळ काढून धोरण नाची गुपित अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या त्यामध्ये महाराष्ट्राचे



मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी दिनांक १२जून २०१८ ला केंद्र सरकारकडे गुपित पत्र देऊन संपूर्ण आरक्षण रद्द करण्याचे डावपेच आरएसएस मार्फत भाजपच्या विचारधारेच्या सरकारला लेखी सूचना देण्यात आल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला . भारत देशा मधील प्रत्येक राज्यात पशु पक्षाची गणना केली जाते पण जातनिहाय आरक्षणासंदर्भात केली जात नाही हे दुर्दैव आहे. जातनिहाय जनगणना देशात झाली तर ५० टक्के ची आठ रद्द करून ७०% च्या आसपास आरक्षण जाईल ही खरी जातिवादी नेत्यांना भीती आहे. ओबीसी एससी एसटी अल्पसंख्यांक मागासवर्गीय जर जातीनिहाय जनगणने शासनाच्या नियमानुसार मुद्देनिहाय जनगणना झाली तर जातीवादी सरकारचा अन्याय केलेल्या नेत्यावर राजकारणातून तडीपार केल्याशिवाय राहणार नाही म्हणून तर भाजपचे सरकारला धोका होऊ शकतो हा खरा डावपेच राजकीय आहे .कॉँग्रेसच्या काळात मनमोहन सिंग च्या नेतृत्वाखाली पाच हजार कोटी रुपये जनगणना करण्यासंदर्भात खर्च करून जातनिहाय जनगणना करताना सामाजिक शैक्षणिक आर्थिक

◀◀ पान ३ वर

# भगवान गडावरील मंदिराच्या बांधकामासाठी सावरगावकरांची एक कोटी पाच लाखांची देणगी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील सावरगाव सोने या दीड हजार लोकसंख्येच्या गावाने एकजूट दाखवत राष्ट्रसंत भगवान बाबा मंदिरासाठी तब्बल एक कोटी पाच लाख रुपयांची देणगी जमा केली देणगीश्री शेत्र भगवानगडाची प्रमुख नामदेव शास्त्री महाराज यांच्या उपस्थितीत अखंड हरिनाम सप्ताह प्रसंगी ग्रामस्थांकडून औक्षण करून सुपूर्द करण्यात आली महिलांनी केली पाच लाखाची देणगी गोळा फक्त पुरुषच नाही तर गावातील कष्टकरी महिलांनी देखील पाच लाख रुपयांची वर्गणी गोळा करून आपल्या योगदानाची साक्ष दिली आपला वाटा असावा पवित्र कार्यात भावनेने प्रेरित होऊन त्यांनी देणगी दिली. ६७ वर्षापूर्वी राष्ट्रसंत भगवान बाबांनी या भूमीत हरिनाम सप्ताहाची मूर्ती मेट्रोली त्याकाळी अज्ञान व्यसन अंधश्रद्धेच्या गरजेत अडकलेल्या कष्टकरी समाजाला त्यांनी नामस्मरणाच्या मार्गावर आणले आजही बहुतेक ग्रामस्थांची उपजीविका शेतीवर असून काही ऊसतोड अल्पसंख्याक नोकरदार वर्ग आहे मात्र भगवान बाबाच्या कार्याची ओढ खरेदीची विनिती घट्ट आहे की आपल्या परंपरेने दिलेली आहे एक भव्य मंदिर साकारण्यासाठी सर्वांनी खारीचा वाटा उचलला या ऐतिहासिक प्रसंगी गावातील महिला पुरुष रद्द करून असे पूर्ण गाव हरीण आमच्याकडे सहभागी झाले महत्त्व नामदेव शास्त्री महाराजांनी यावेळी भाविकांचे अभिनंदन करीत ही दिंडी केवळ आर्थिक मदत नाही तर भगवान बाबांच्या कार्यावरील तुमची निष्ठा आहे असे गौरव गौरव उद्गार काढले यावेळी सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.



**बीड : प्रशासकीय सेवेतील उत्तम कामगिरीबद्दल सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री सुभाष सानप यांना दिनांक ३ मे २०२५ रोजी वाहतूक शाखेमध्ये मातृभूमी प्रतिष्ठान च्या वतीने सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे दिसत आहेत.**

# छगन भुजबळ यांच्या समता परिषदेच्या लढ्याला अखेर यश -दत्ताभाऊ बोडखे

## मोदी सरकारच्या ऐतिहासिक व क्रांतीकारी निर्णयाचे समता परिषदेच्या वतीने स्वागत!

**आष्टी । प्रतिनिधी**

मोदी सरकारने देशात जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल देशातील ओबीसी समाजाच्यावतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह संपूर्ण मंत्रिमंडळाचे आभार मानले जात आहे. मोदी सरकारचा हा निर्णय ऐतिहासिक व क्रांतिकारी आहे. स्वातंत्र्योत्तर भारतात प्रथमच जातनिहाय जनगणना होणार आहे.आष्टी तालुका समता परिषदेने येथील म.फुले यांच्या चौकात फटाके वाजवून आणि पेढे वाटून या निर्णयाचे स्वागत केले.जातनिहाय जनगणनेच्या मागणीसाठी १९९२ पासून अ.भा.म. फुले समता परिषदेच्या



माध्यमातून सातत्याने विविध आंदोलने करुन पाठपुरावा करण्यात आला आहे.भरतात अनेक मोठ्या शहरात झालेल्या म.फुले समता परिषदेच्या महामेळाव्यामध्ये छगन भुजबळ यांनी देशातील ओबीसींची जातनिहाय जनगणना व्हावी अशी मागणी केली होती.२०१० मध्ये जातनिहाय जनगणना करण्यासाठी समता परिषद सर्वोच्च न्यायालयात गेली होती.तत्कालीन खासदार समीर भुजबळ यांच्या माध्यमातून संसदेत जोरदारपणे ही मागणी केली होती. त्यावेळी माजी केंद्रीय मंत्री स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब खंबीरपणे पाठीशी उभे राहिले.

# अनिल जगताप यांच्या उपस्थितीत अशोक दुधाळ यांची शिवसेना बीड तालुका ओबीसी व्हिजेएनटी तालुका अध्यक्षपदी नियुक्ती!

बीड । प्रतिनिधी

हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते माननीय नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसेनेच्या दमदार कार्यपद्धतीस प्रभावित होऊन ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेबजी किसवे साहेब आणि शिवसेना



जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख किरण चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तथा ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण यांच्या माध्यमातून अशोक दुधाळ यांची शिवसेना बीड तालुका ओबीसी / व्हिजेएनटी तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती शिवसेना बीड जिल्हाप्रमुख मा. अनिल दादा जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत, ओबीसी / व्हिजेएनटी सेल जिल्हाप्रमुख श्री. मनोज चव्हाण यांच्या माध्यमातून पार पडली. अशोक दुधाळ हे सामाजिक प्रश्नांवर सातत्याने काम

◀◀ पान ३ वर

# वंजारवाडी गावातील जो आयएएस-आयपीएस अधिकारी होईल त्यांना पाच लाख रुपये बक्षीस देणार -सर्जेराव तांदळे

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील आदर्शगाव वंजारवाडी येथिल छत्रपती शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मातोश्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये आज महाराष्ट्र दिनानिमित्त अध्यक्षिय भाषणावेळी बोलत असताना मा.ॲड.श्री. सर्जेराव तात्या तांदळे म्हणाले की, मुलांनी बिरुदेव डोने यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवुन उज्वल भविष्य घडवावे. प्रचंड इच्छाशक्ती असेल तर यश निश्चित मिळते. आदर्श गाव म्हणुन वंजारवाडी जिल्हा स्तरावर



आदर्श ठरली आहे. आता शैक्षणिक क्षेत्रातही आपल्याला गगणभरारी घ्यायची आहे. तुम्ही शिक्षणाचे ध्येय ठेवा मी सक्षमपणे तुम्हच्या पाठिशी उभा आहे. वंजारवाडी गावातील शाळेत शिक्षण घेवुन जो कोणी आयएएस-आयपीएस अधिकारी होईल त्यांना मी पाच लाख रुपये बक्षीस देणार असे वचन तात्यासाहेब यांणी दिले. यावेळी तात्यांनी महाराष्ट्र राज्याची निर्मिती, व कामगार दिनाची माहिती सविस्तरपणे विद्यार्थ्यांना सांगितली.

सर्वप्रथम यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पुजन करुन ग्रामपंचायत कार्यालय, जि.प.प्रा.शाळा व मातोश्री विद्यालयामध्ये ध्वजारोहन करण्यात आले. पांडुरंग नाना राख यांणी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक नागरगोजे सर यांणी केले. जि.प. शाळेचा निकाल भारती मॅडम यांणी जाहिर केला. यावेळी व्यासपिठावर मा.सौ. मोनाली अरुण धुरंधरे,

◀◀ पान ३ वर


# स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांची सात दिवस श्रीमद् भागवत कथा

**नेकनुर । प्रतिनिधी**

वारकरी सांप्रदायाचे भक्ती सूर्य स्वानंद सुखनिवासी जोग महाराज यांचे पट्ट शिष्य महान संत श्रीगुरु वै.बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी महोत्सवा निमित्त श्री क्षेत्र नेकनूर येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे . दि ६ मे २०२५ वार मंगळवार ते दिनांक १३ मे २०२५ वार मंगळावर या आठ दिवसाच्या कालावधीमध्ये भव्य ज्ञानयज्ञ संपन्न होणार आहे. यात २४ तास अखंड अन्नदान आणि ज्ञानदान सोहळा होणार आहे.. याचा सर्व भाविक भक्तानी लाभ घ्यावा.

यात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध भागवत कथाकार प पू भास्करगिरी महाराज देवगडकर यांचे उत्तराधिकारी श्री ह भ प स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांची सात दिवस भागवत कथा होणार आहे . तसेच महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकारांचे कीर्तने होणारं आहेत .या सर्व कार्यक्रमाचा भावीक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे मठाधिपती बंकटस्वामी मठ नेकनुर , पंढरपूर , आळंदी,विश्वस्त ,अन्नदान कमिटी ,गावकरी मंडळी नेकनुरकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र नेकनूर येथे





संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात दि- ६ मे पासून सुरुवात होणार आहे यात आठ दिवस कार्यक्रमाची रेलचेल राहणार आहे..पहाटे ४ ते ६ काकडा भजन ,सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण , १० ते १२ गाथा भजन , दुपारी १२ ते २ भोजन ,२ ते ५ भागवत कथा, ५ ते ६ हरीपाठ रात्री ८.३० ते १०.३० हरिकिर्तन व ११ नंतर संगीत भजन व हरीजागर होईल .

यात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध श्री ह भ प स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांचे सूश्राव्य भागवत कथा होणार आहे.तसेच

### आठ दिवस बंकटस्वामी महाराज संस्थान करणार गरजू मुलींचे कन्यादान

महाराष्ट्रातिल नांमाकित कीर्तनारांची किर्तने व संगीत भजन,प्रवचन आदि कार्यक्रम होणार आहेत . दिनांक ६ मे २०२५ रोजी सकाळी ८ वाजता बंकटस्वामींच्या पालखीची नेकनूर येथिल बंकटस्वामी शिक्षक कॉलनी येथून भव्य शोभा यात्रा निघणार आहे.

या सप्ताहा दरम्यान पहिल्या दिवशी श्री ह.भ.प. शांतीब्रह्म महादेव महाराज चाकरवाडीकर, दुसरा दिवस ह.भ.प. बाळकृष्ण महाराज वसंतगडकर , तिसरा दिवस ह भ.प. महंत गुरुवर्य विठ्ठल महाराज गहिनीनाथगडकर, चौथा दिवस ह भ प चैतन्य महाराज निंबोळे नाशिक, पाचवा दिवस ह.भ.प. भागवताचार्य समाधान महाराज शर्मा, सहावां दिवस ह.प.भ. उल्हास महाराज सूर्यवंशी, सातवा श्री ह.भ.प. रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर ,यांचे रात्री ८.३० ते १०.३० किर्तन होईल .दिनांक १३ मे रोजी श्री ह.भ.प.ज्ञानसिंधू संदीपान महाराज हसेगावकर अध्यक्ष वारकरी शिक्षण संस्था आळंदी देवाची यांचे सकाळी ११ ते १ काल्याचे किर्तन होईल व त्यानंतर महाप्रसाद वाटप होईल.

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# कोट्यवधींचा खर्च करुन शाळांमध्ये बसवलेली ‘ई-लर्निंग’ यंत्रणा ठप्प; नेमके कारण येईना लक्षात

**पुणे । प्रतिनिधी**

कोट्यवधी रुपये खर्च करून महापालिकेच्या शाळांमध्ये ई लर्निंग यंत्रणा सुरु करण्यात आली होती. मात्र गेल्या तीन वर्षापासून ई लर्निंग यंत्रणा बंद झाली आहे. यासंदर्भात अतिरिक्त आयुक्त एम जे प्रदीप चंद्रन यांनी दुजोरा दिला असुन, ही यंत्रणा बंद असण्यामागील कारण माहिती नसल्याचे त्यांनी नमूद केले.



पुणे महापालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे, यासाठी २०१७ साली ई-लर्निंग यंत्रणा महापालिकेच्या शिक्षण मंडळांच्या शाळांत उपलब्ध करूनदिली गेली. यासाठी सुमारे २० कोटी ९९ लाख रुपये खर्च केले गेले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे सत्र, तसेच विविध विषयांवरील माहीती देण्यासाठी लाखो रुपये करुन आकाशवाणीच्या धर्तीवर स्टुडिओ देखिल उभारला आहे. मात्र ही यंत्रणाच बंद पडल्याने स्टुडिओसह सर्व यंत्रणा धूळखात पडून आहे. इंटरनेटची सुविधाच नसल्याने ही यंत्रणा बंद पडल्याचे प्रशासनातील एका अधिकाऱ्याने सांगितले आहे. रिलायन्सच्या जिओ कंपनीने देशभरातील स्थानिक स्वराज्य संस्था आणि पालिकांच्या शाळांना मोफत इंटरनेट सेवा देण्याची घोषणा केली होती.

महापालिका प्रशासनाने या सेवेसाठी पाठपुरावा करुन शाळांमध्ये ई-लर्निंग शिक्षण देण्यासाठी इंटरनेट जोडून घेतले होते. त्यानुसार शहरातील विविध माध्यमांच्या २६५ शाळांमध्ये ई- लर्निंग सुरु झाले होते. विद्या निकेतन, इंग्रजी माध्यमांच्या शाळा, क्रीडा निकेतन, संगीत विद्यालय यासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाची जोड असलेल्या ई-लर्निंगसाठी प्रयत्न करण्यात आले होते. गेल्या सात ते आठ वर्षांपासून ई-लर्निंगच्या माध्यमातून शिक्षण देण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केले गेले. प्रत्येक इयत्तेनुसार अभ्यासक्रमाची सॉफ्टवेअर तयार करण्यात आली. २६५ शाळांतील वर्गखोल्यांमध्ये टीव्ही संच (स्क्रीन), तसेच शाळांसाठी संगणक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सुरवातीला बीएसएनएल या शासकीय कंपनीकडून सेवा घेण्यात आली. कोरोनामध्ये शाळा बंद राहिल्याने ही सेवा काहीशी विस्कळीत झाली होती. मात्र त्यानतंर याकडे लक्ष देण्यात आलेले नाही. केवळ इंटरनेट सेवा बंद असल्याने ई-लर्निंग बंद असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात येत आहे.

**इंटरनेट नसल्याने यंत्रणेवर धुळ**

बीएसएनएल पालिकेला इंटरनेट सेवा देण्यास असमर्थ ठरली आहे. रिलायन्स कंपनीने देशभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांना मोफत इंटरनेट सेवा देण्याचे जाहीर केले आहे. या योजनेअंतर्गत रिलायन्स कंपनीच्या जिओ इंटरनेटसाठी पाठपुरावा केला जातो. मात्र त्यानंतर ही जिओचे इंटरनेट महापालिकेला घेता आलेले नाही. केवळ प्रशासनाच्या उदासीनतेमुळे ही यंत्रणा धूळखात पडून आहे. याबाबत पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त एम जे प्रदीप चंद्रन म्हणाले की, “महापालिकेतील विविध विभागांचा आढावा घेतला. महापालिकेच्या शाळांमध्ये सुरु केलेली ई-लर्निंग यंत्रणेबाबत चर्चा झाली. ही यंत्रणा बंद असल्याची माहिती विभाग प्रमुखांनी दिली. परंतु ही यंत्रणा का बंद आहे, याचे कारण त्यांनी सांगितले नाही. तसेच मलाही माहिती नाही. यंदाच्या शैक्षणिक वर्षात ही यंत्रणा पुन्हा राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.” असे मत चंद्रन यांनी आणले आहे.

## मी पुण्याचा डॉन आहे, जेलरला संपवले, आता तुलाही; पोलिसाला धमकी देत केली मारहाण




**शिक्रापूर । प्रतिनिधी**

राज्यात गुन्हेगारी वाढली असून, राज्यातील वेगवेगळ्या भागातून गुन्हेगारीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता पुणे जिल्ह्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. सणसवाडी (ता. शिरुर) येथे दोन कारच्या झालेल्या अपघातानंतर घटनास्थळी तपासासाठी गेलेल्या पोलीस कर्मचाऱ्याला मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आरोपीने मी पुण्याचा डॉन आहे अशी ओळख सांगत वायरलेस मशीनही हिसकावली आहे. याप्रकरणी ऋषिकेश हरिषचंद्र गुंजाळ (वय २९, रा. पांडवनगर, गुंजाळवाडी, पुणे) याच्यावर शिक्रापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेची सविस्तर माहिती अशी की, पुणे-नगर महामार्गावर दोन कारमध्ये अपघात झाल्यानंतर वाद निर्माण झाला. दोघांनीही डायल ११२ वर संपर्क साधल्याने शिक्रापूर पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले. पोलिस कर्मचारी अपघाताची माहिती ११२ मशीनवर भरत असताना संशयित आरोपी ऋषिकेश गुंजाळ याने पोलिसाच्या हातातील मशीन हिसकावून घेत, मी पुण्याचा डॉन आहे, जेलरला संपवले, तुलाही संपवेल असे म्हणत मोठ्याने आरडाओरड केली.

## हडपसर ते यवत उड्डाणपूलासाठी ५,२६२ कोटी मंजूर; राहुल कूल यांच्या पाठपुराव्याला यश !

**पुणे । प्रतिनिधी**

सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९ वरील हडपसर ते यवत दरम्यान वाहतूक कोंडी, नागरिक त्रास आणि रस्ता रुंदीकरणासाठी जागेची अडचण लक्षात घेता सहापदरी उन्नत मार्ग (उड्डाणपूल) उभारणी व रस्ता रुंदीकरणासाठी सुमारे ५२६२.३६ कोटी रुपयांचा प्रकल्प राज्य सरकारने मंजूर केला आहे.



या प्रकल्पासाठी दौंडचे आमदार राहुल कूल यांनी राज्य आणि केंद्र सरकारकडे सातत्याने मागणी केली असून, त्यांच्या प्रयत्नांमुळे हा महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, या प्रकल्पासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडेही आमदार राहुल कुल यांनी पाठपुरावा केला होता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी देखील या प्रकल्पाची सखोल दखल घेतली आणि सविस्तर डीपीआर तयार करण्याचा सूचना दिल्या होत्या ज्यामुळे प्रकल्पाची अंमलबजावणी आज शक्य झाली आहे.

आमदार राहुल कूल म्हणाले, हडपसर ते यवत या महामार्गावरील वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून मी सातत्याने राज्य आणि केंद्र सरकारकडे मागणी केली. आज या प्रयत्नांना यश मिळाले असून, या प्रकल्पामुळे पूर्व पुणे, हवेली व दौंड तालुक्यातील नागरिकांचे जीवनमान सुधारेल, वाहतूक सुरळीत होईल आणि भागाचा सर्वांगीण विकास होईल. या निर्णयासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले आणि नितीन गडकरी यांचे मनःपूर्वक आभार. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर या मार्गावर वाहतूक सुरळीत होऊन अपघात कमी होतील आणि स्थानिक विकासाला मोठा चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## आरटीओ प्रशासनाकडून जप्त वाहनांचा ई- लिलाव

**पुणे । प्रतिनिधी**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्या वतीने जप्त करण्यात आलेल्या विविध प्रकारची एकूण १६५ निष्क्रिय वाहने ई- लिलावाच्या माध्यमातून विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या लिलावासाठी अर्ज व पात्रता तपासणीची अंतिम मुदत १३ मे २०२५ पर्यंत असून, लिलाव ९ मे आणि १५ मे २०२५ रोजी ऑनलाइन पद्धतीने होणार आहे.

जप्त वाहने दोन टप्प्यांत लिलावात सहभागी करण्यात आली आहेत. २१ वाहने ु.शर्रीलींळेप.सीं.ळप या पोर्टलवर १५ मे रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळेत लिलावात येतील, तर उर्वरित १४४ वाहने ु.ीींलळपवळर.ले.ळप या पोर्टलवर ९ मे रोजी १२ ते ४ या वेळेत लिलावात उपलब्ध राहतील. ई- लिलावात सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी शुल्कासह अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

लिलावात जिंकलेले वाहन स्क्रॅपिंगसाठी अधिकृत केंद्राकडे सुपूर्द करणे बंधनकारक आहे. ही प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडावी, यासाठी लिलाव ऑनलाइन माध्यमातून होणार असून, इच्छुकांनी संबंधित वेबसाइटवर आवश्यक नोंदणी करून सहभागी व्हावे, असे आवाहन आरटीओ प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## पुण्यात पुन्हा हिट अँड रन ! भरधाव मर्सिडिज कारच्या धडकेत तरुणाचा जागीच मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात वडगाव ब्रीजवर एका भरधाव मर्सिडिज कारने दुचाकीस्वारांना ठोकरले. यामध्ये एकाचा जागीच मृत्यू झाला तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. कार चालक मद्याच्या नशेत असल्याचे प्राथमिक तपासणीत उघड झाले आहे. दरम्यान अपघातग्रस्त कार पुलावरुन खाली पडल्याने चालकासह चौघे जखमी झाले आहे. इतर तिघांनीही मद्यपान केले होते. पोर्शे कार अपघातानंतर पुन्हा एकदा बड्या बापाच्या मुलाने केलेल्या अपघाताने पुणे शहरत हादरले आहे.



कुणाल मनोज हुशार (२३,रा.चिंचवड) असे मृताचे नाव आहे. तर त्याचा साथीदार प्रज्योत दिपक पुजारी (२३,रा.चिंचवड) हाही घटनेत जखमी झाला आहे. कार चालक शुभम राजेंद्र भोसले (२३,रा.निगडी प्राधिकरण) याला सिंहगड पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्या सोबत कारमध्ये निखील मिलींद रानवडे (२६,रा.औंध गाव), श्रेयस रामकृष्ण सोळंखी(२५,रा.चिंचवड) आणि वेदांत इंद्रसिंग रजपूत (२८,रा.निगडी) हे तिघेही कारमध्ये होते. ते अपघातात जखमी झाले आहेत.

आरोपी आणि त्याचे मित्र हे पोस्ट ग्रॅज्युएशन पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार ही कार(एमएच ०१ बीके ४६२५) आरोपी शुभमच्या आईच्या नावाने आहे. शुभम शुक्रवारी रात्री कार घेऊन घरातून बाहेर पडला. त्याने सोबत निखील, श्रेयस आणि वेदांत यांना घेतले. हे चौघेही हिंजवडी येथे एका ढाब्यावर जेवण करायला गेले. तेथे जेवणाबरोबर मद्यपान केल्यावर लाँग ड्राईव्हला जायचे ठरले. यानंतर शुभमने गाडी खेड शिवापुरला नेली.

तेथून ते परतत असताना पहाटे साडेतीनच्या सुमारास वडगाव ब्रीजवर समोरील दुचाकीला धडकले. यानंतर कार पलटीखात पुलावरुन खाली पडली. मात्र गाडीची एअर बॅग उघडल्याने चौघेही बालंबाल बचावले. अपघातात मात्र दुचाकीवरील कुणाल आणि प्रज्योत गंभीर जखमी झाले. यात कुणालचा उपचारापुर्वीच मृत्यू झाला. याप्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप दाईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

अपघातातील मृत कुणाल आणि प्रज्योत हे बीएस्सी कॉम्पुटरचे शिक्षण घेतात. ते दोघेही चिंचवडवरुन शंकर महाराज मठात किर्तनासाठी आले होते. किर्तनाचा कार्यक्रम उरकून ते घरी परतत असताना हा अपघात झाला.

# पुणे जिल्ह्यात पाण्याचा प्रश्न जटिल!

## विभागात टँकरची संख्या पोहोचली तब्बल १५० च्यावर

**पुणे । प्रतिनिधी**

नवराष्ट्र न्यूज नेटवर्क : पुणे जिल्ह्यासह पुणे विभागात पाणी टंचाईच्या तीव्र झळा बसत आहेत. दिवसेंदिवस यामध्ये वाढ होताना दिसत असून, आजमितीला पुणे जिल्ह्यातील १३ पैकी ७ जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याचा टँकर द्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. तर पुणे विभागातील पुण्यासह सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर येथे १५० च्या वर टँकरने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात आहे.

पुणे शहर जिल्ह्यासह पुणे विभागात सध्या उन्हाची तीव्रता वाढत आहे. एप्रिल महिन्यातच उष्णतेच्या तीव्र लाटेने अंगाची लाहीलाही झाली. त्यातच हवामान खात्याने येत्या काही दिवसात उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. दरम्यान उन्हाच्या झळांसोबतच विभागातील अनेक धरणे, तलावातील जलसाठा कमी झाला आहे. नदी नाले तर कधीच कोरडेठाक पडले आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. काही ठिकाणी टँकरच्या फेऱ्या सुरू झाल्या आहेत, तर अनेक ग्रामपंचायतींवर ‘हंडा मोर्चा’ निघत आहेत.



उन्हाळ्यापूर्वी पाण्यासाठीची कोणतीच तजवीज नसल्याने पाणीटंचाईचे सावट भीषण होण्याची शक्यता आहे. जनावरांच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विभागातील गावांत यंदाही भीषण पाणीटंचाई आहे. गावातील तलाव पूर्ण कोरडे पडल्याने गावाशेजारील विहिरीतून महिलांना पाणी आणावे लागत आहे. टँकरद्वारे विहिरीत पाणी सोडले जाते आणि मग ते पाणी महिला भरतात. ही परिस्थिती अनेक ठिकाणी पाहण्यास मिळत आहे.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, पुणे जिल्ह्यातील १३ तालुक्यापैकी ७ तालुक्यात सध्या टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. यात आंबेगाव तालुक्यातील १९ गावात १९ टँकरने, भोर तालुक्यातील २ गावात २ टँकरने, हवेली तालुक्यातील २ गावात २ टँकरने, जुन्नर तालुक्यातील १५ गावात १३ टँकरने, खेड तालुक्यातील १० गावात ९ टँकरने, पुरंदर तालुक्यातील १७ गावात १७ टँकरने, शिरूर तालुक्यातील ३ गावात ७ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. पाणी टंचाई मुळे जिल्ह्यातील ६८ गावांमधील ४६२ वाड्या बाधित झाल्या असून, १ लाख १८ हजार ८४३ नागरिकांची तहान जिल्हा परिषदेच्या माध्यमातून भागवली जात आहे.

**जलवाहिन्यांचे नकाशे नाहीत उपलब्ध**

शहराच्या कानाकोपऱ्यात पाणीपुरवठा विभागाने जलवाहिन्यांचे जाळे निर्माण केले आहे. अनेक जलवाहिन्यांद्वारे पाणी येण्यास अडथळा येत आहे. तसेच जलवाहिन्याअसून देखिल पाणी येत नाही. जलवाहिन्यांचे कनेक्शन तसेच वॉल दुरुस्ती केली जाते. परंतु शहरातील जलवाहिन्यांचे नकाशेच पाणीपुरवठा विभागाकडे उपलब्ध नाहीत. त्यामुळे पाण्याची समस्या सोडविण्यास वेळ लागत असल्याने नागरिकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे.

## पोलीस उपनिरीक्षकावर बलात्काराचा गुन्हा

**पुणे । प्रतिनिधी**

जातीवाचक शिवीगाळ, तसेच बलात्कार केल्याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षकाविरुद्ध विश्रामबाग पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. नोंदणी पद्धतीने तरुणीशी विवाह केल्यानंतर तिच्याकडून वेळोवेळी १० ते १२ लाख रुपये उपनिरीक्षकाने घेतले. उपनिरीक्षकपदी निवड झाल्यानंतर त्याने विवाह नाकारुन तरुणीला जातीवाचक शिवीगाळ केली तसेच गर्भपात करण्यास भाग पाडले, असे पीडित तरुणीने फिर्यादीत म्हटले आहे.

याप्रकरणी एका २८ वर्षीय तरुणीने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, पोलीस उपनिरीक्षक विराज गावडे (वय ३२, रा. गोखळी, ता. फलटण, जि. सातारा), त्याचा भाऊ कुणाल तसेच वडील गजानन यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, आरोपी विराज गावडे हा पुण्यात स्पर्धा परीक्षेची तयारी करीत होता. त्याची २०२० मध्ये पीडित तरुणीशी ओळख झाली. त्यांच्यात प्रेमसंबंध निर्माण झाले. दोघांनी नोंदणी पद्धतीने विवाह केला. ही बाब त्याने कुटुंबीय, मित्रांपासून लपवून ठेवली. पीडित तरुणीला पत्नीप्रमाणे दर्जा दिला नाही. तरुणीने याबाबत त्याच्याकडे विचारणा केली. तेव्हा कुटुंबीयांना विवाहाबद्दलची माहिती देतो, असे सांगून विराज याने तरुणीकडून वेळोवेळी १० ते १२ लाख रुपये घेतले. तसेच, त्याने तरुणीशी शारीरीक संबंध ठेवले. दरम्यान, विराज याची उपनिरीक्षकपदी निवड झाली. पीडित तरुणीने त्याच्याकडे विचारणा केली. कुटुंबीयांशी ओळख करुन दे, तसेच विवाहाची माहिती त्यांना दे, अशी विनंती तिने केली. तेव्हा त्याने टाळाटाळ सुरू केली. माझे कुटुंबीय माझ्याशी स्थळ पाहत आहेत. तू खालच्या जातीची आहे. आपला विवाह कुटुंबीय मान्य करणार नाही. माझा विचार सोडून दे, असे त्याने तिला सांगितले. त्याने तरुणीला भेटण्यास टाळाटाळ सुरू केली. त्याचे वडील गजानन आणि भाऊ कुणाल यांनी त्याला साथ दिली. मला वडिलांच्या जागेवर चंद्रपूर येथे नोकरी मिळणार होती. विराजच्या सल्ल्यामुळे मी नोकरी नाकारली. आज, मला नोकरीही नाही तसेच विराजने माझी फसवणूक केली. मला धमकावून गर्भपात केला, असे पीडित तरुणीने फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणाचा तपास सहायक पोलीस आयुक्त अनुजा देशमाने तपास करीत आहेत.

## चिखलीत लेबर कॅम्पमधील बेकायदा दारू अड्डा उध्वस्त! आमदार लांडगेंच्या सुचनेनंतर पोलिसांची कारवाई

**पिंपरी । प्रतिनिधी**

चिखली येथील एका लेबर कॅम्पमध्ये देशी दारूचा अनधिकृत अड्डा चालवला जात होता. या ‘लेबर कॅम्प’ मध्ये तीन हजाराहून अधिक लेबर वास्तव्याला आहेत. धक्कादायक प्रकार म्हणजे या लेबर कॅम्पला लागूनच मोठी गृहनिर्माण वसाहत असून, या देशी दारूच्या अड्ड्यामुळे वारंवार वादाचे प्रसंग उद्भवले जात होते. त्यामुळे सदर दारुचा अड्डा उध्वस्त करण्यात आला.



बेकायदेशीर दारुच्या अड्ड्यामुळे स्थानिक सोसायटीधारकांनी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्याकडे तक्रार केली होती. त्या अनुशंगाने आमदार लांडगे यांनी पिंपरी-चिंचवड पोलिसांना उचित कारवाई करण्याबाबत सूचना केली होती. दरम्यान, पोलिसांनी तात्काळ दखल घेऊन हा दारूचा अड्डा उखडून टाकला. या कारवाईमुळे येथील सोसायटी धारकांनी अक्षरशः सुटकेचा निश्वास सोडला. चिखली येथील हॅरिझन आणि लेगसी रिव्हरसाईड सोसायट्यांच्या मागे असलेल्या बेकायदेशीर देशी दारूचा अड्डा चालवला जात होता. या मजूर कॅम्पमध्ये साधारण दोन ते तीन हजार मजूर वास्तव्याला आहेत. या दारू दुकानात वारंवार वादाचे प्रसंग उद्भवतात. मद्यधुंद अवस्थेतील हे मजूर सोसायटी धारकांसमोर अश्लील वर्तन करतात आणि अपशब्द वापरतात. अनेक वेळा त्यांनी सोसायट्यांवर दगड फेकले. यामुळे विशेषतः महिलांसाठी, लहान मुलांसाठी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी असुरक्षित वातावरण निर्माण झाले असल्याची तक्रार रहिवाशांनी केली होती.

**लेबर कॅम्पमध्ये बांगलादेशी घुसखोर असण्याची शंका**

चिखलीच्या मध्यवस्तीत रहदारीच्या परिसरात असणाऱ्या या लेबर कॅम्प मधील मजुरांचे पोलीस सत्यापन आणि ओळख तपासणी करण्याची मागणी येथील नागरिकांनी केली आहे. या कॅम्पमध्ये बांगलादेशी घुसखोर असण्याची शक्यता देखील रहिवासांनी व्यक्त केली आहे आगामी काळात यांच्यामुळे परिसरातील नागरिकांना कोणत्याही प्रकारचा धोका उद्भवू नये असे देखील नागरिकांनी म्हटले आहे.

नागरी मध्यवस्तीत, सोसायटीच्या आवारात दारूचे दुकान असल्यास नियमांची कठोर अंमलबजावणी करण्याबाबत राज्य विधिमंडळात निर्णय झाला. त्यानंतर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ४ दारु दुकाने काही दिवसांपूर्वी ‘सील’ करण्यात आली. आता मजुरांच्या लेबर कॅम्पमध्ये बेकायदेशीर दारू अड्डा चालवला जात असल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर कारवाई करण्यात आली. या लेबर कॅम्पमध्ये बांगलादेशी घुसखोर असण्याची शंका स्थानिक नागरिक उपस्थित करत आहे. त्याबद्दलही पोलिसांमार्फत ‘सर्च ऑपरेशन’ करण्याची मागणी केली आहे.

## पहलगाम हल्ल्यानंतर पुणे विभागातील एक्स्प्रेस गाड्यांमध्ये सुरक्षा वाढवली, २४ गाड्यांमध्ये एस्कॉर्टिंग सेवा तैनात

**पुणे । प्रतिनिधी**

पहलगाममध्ये मागील आठवड्यात दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात २६ लोकांनी आपला जीव गमावला होता. पहलकांमध्ये मागील आठवड्यात दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात २६ लोकांनी आपला जीव गमावला होता. हल्ल्याच्या दरम्यान दहशतवादी भारतीय सैन्याच्या वेशात आले होत. हल्ल्याच्या दरम्यान दहशतवाद्यांनी पर्यटकांना धर्म विचारून गोळ्या झाडल्या होत्या. त्यानंतर भारताने अनेक निर्णय पाकिस्तान विरोधात घेतले आहे.

शंतनु कुकडेच्या खात्यावरून कोट्यावधींची उलाढाल; राष्ट्रवादीतील बड्या नेत्याच्या खात्यात पैसे वळवल्याची माहिती

पहलगाममध्ये दहशतवादी हल्ल्यानंतर शासकीय यंत्रणा सतत झाल्या असून रेल्वेने सुरक्षा व्यवस्थेचा फेर आडवा घेण्यास सुरुवात केली आहे. पुण्यात धावणाऱ्या २४ एक्सप्रेस रेल्वे मध्ये विशेष सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे.



पुणे स्थानकाला संवेदनशील स्थानक म्हणून घोषित केले आहे. संभाव्य धोक्यांवर लक्ष ठेवून अधिक कडक सुरक्षा उपाययोजना राबविल्या आहेत.

पुणे स्थानकात अतिरिक्त निरीक्षकाची नियुक्ती केली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून नियमित स्थानिकांची अनपेक्षित तपासणी केली जात आहे. सुरक्षा बल आणि रेल्वे पोलिसांच्या समन्वयाने स्थानकांच्या सुरक्षेचा आढावा घेतला जात आहे, सोबतच सीसीटीव्ही कॅमेरा द्वारे देखील लक्ष ठेवले जात आहे. पुढे सह मिरज कोल्हापूर या महत्त्वाच्या स्थानकांवर श्वान पथकाद्वारे तपासणी केली जात असून सर्व सुरक्षा कर्मचाऱ्यांना ड्युटीवर असताना शस्त्र बाळगण्याची आदेश देण्यात आले आहे.

पुणे विभागातील सुमारे २४ महत्त्वाच्या एक्सप्रेस व मेल गाड्यांमध्ये एक्सपोर्टिंग व्यवस्था करण्यात आली आहे. रात्रीच्या वेळी एक निरीक्षक नियंत्रण कक्षाशी समन्वय साधून परिस्थितीवर लक्ष ठेवत आहे. सुरक्षा बलाची निरीक्षक आपापल्या कार्यक्षेत्रातील गाड्यांमध्ये गस्तीचे काम करत आहे. संवेदनशील बाबीची माहिती त्वरित नियंत्रण कक्षाला दिली जात आहे. स्थानकांवर व गाड्यांमध्ये सध्या देशातील विशेष पथके तैनात करण्यात आली आहे प्रवाशांकडून रेल मदत या प्लॅटफॉर्मवर केल्या जाणाऱ्या तक्रारींची नियमितपणे दखल घेतली जात आहे. असे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

मिरज स्थानक संवेदनशील सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून मिरज रेल्वे स्थानकाची संवेदनशील आहे. या स्थानकात पूर्वीही अनेकदा गुन्हेगारांची धरपकड झाली आहे. स्थानकाबाहेरील परिसरात अनेकदा गुन्हेगारी कारवाई, लुटमरी झाले आहेत. या पार्श्वभूमीवर येथील सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली आहे.